मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, सोमवार, ३० सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १०० | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## हिजबुल्ला प्रमुख नसराल्लाचा मृतदेह सापडला

**बैरुत:** शुक्रवारी इस्रायलच्या हल्ल्यात ठार झालेला हिजबुल्लाचा प्रमुख हसन नसराल्ला यांचा मृतदेह सापडला आहे. वैद्यकीय आणि सुरक्षा पथकांनी हल्ल्याच्या ठिकाणाहून नसराल्लाचा मृतदेह बाहेर काढला. वृत्तसंस्था रॉयटर्सने दिलेल्या माहितीनुसार, हसन यांच्या शरीरावर हल्ल्याच्या थेट खुणा नाहीत. त्यांच्या मृत्यूमागे मोठा स्फोट झाल्यामुळे झालेला आघात असल्याचे मानले जात आहे.येथे रविवारी इस्रायलने लेबनॉनच्या सीमेवर रणगाडे तैनात केले. अल्जझीराने त्यांची छायाचित्रेही प्रसिद्ध केली आहेत. नसराल्ला यांच्यावर झालेल्या हल्ल्याची माहिती होती, असे अमेरिकेच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे. या कारवाईसाठी लढाऊ विमानांनी उड्डाण केल्यानंतर इस्रायलने त्यांना माहिती दिली होती.



मराठ्यांना बाजूला ठेवणे तुमची घोडचूक असेल...
पान ५

# काँग्रेसच्या राजवटीत मेट्रोचा एक पिलरही उभारला गेला नाही!

### पुणे मेट्रो कॉरिडॉर ऑनलाईन उदघाटन सोहळ्यात पंतप्रधान मोदींचा निशाणा



**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली/पुणे**

2008 मध्ये असलेल्या सरकारच्या काळात मेट्रोचा एक पिलरही ते सरकार उभा करू शकले नाही. ही विचार सरणी जर आज सत्तेत असती तर मेट्रोचे काम अजूनही होऊ शकले नसते, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तत्कालीन काँग्रेस सरकारवर निशाणा साधला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे बोलताना म्हणाले की, दोन दिवसांपूर्वी पुण्यातील कार्यक्रमास मी येऊ शकलो नाही, यात माझेच खूप मोठे नुकसान आहे. कारण पुण्यातील कणकणात राष्ट्रभक्ती आणि समाजभक्ती आहे. अशा पुण्यात येणे ऊर्जावान बनवते. त्यामुळे मी आज पुण्यात येऊ शकलो नाही यात माझे मोठे नुकसान आहे, अशी खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. पुण्यातील जिल्हा न्यायालय ते स्वारगेट पर्यंतच्या मेट्रो कॉरिडोरच्या ऑनलाईन उद्घाटनाच्या सोहळ्यात ते बोलत होते.

### विठूरायांच्या भाविकांसाठी विमानतळ

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज विठ्ठलाच्या आशिर्वादाने त्यांच्या भक्तांना उपहार भेटला आहे. सोलापूरला एअर कनेक्टीव्हीला जोडण्यासाठी विमानतळाला अद्यावत करण्याचे काम पूर्ण झाले आहे. याठिकाणी प्रवाशांसाठी विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आता थेट सोलापूरला येता येणार आहे. यामुळे व्यवसाय आणि पर्यटनाला चालना मिळणार आहे. या विकासकामांसाठी मी महाराष्ट्रातील जनतेला शुभेच्छा देतो.

### आरोपीने गोळीबार केल्यावर पोलिसांनी बंदुका शोकेसमध्ये ठेवायच्या का - मुख्यमंत्री शिंदे

विरोधकांना दोन्ही बाजूंनी बोलायची सवयच आहे. बदलापूर प्रकरणात आधी म्हणत होते. आरोपीला भरचौकात फाशी द्या. आता आरोपीने पोलिसांवरच गोळीबार केला तर पोलिसांनी बंदूकी शोकेसमध्ये ठेवायच्या का, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणे मेट्रोच्या उद्घाटन प्रसंगी मविआला लगावला आहे. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, पुणे मेट्रोचा कार्यक्रम खरेतर गुरुवारी होणार होता. परंतू पावसामुळे उद्घाटन होऊ शकले नाही. सर्वकाही तयारी होती. परंतू लोकांना त्रास होईल म्हणून पंतप्रधानांनी स्वत: हा कार्यक्रम पुढे ढकलण्याची विनंती केली.परंतू विरोधक दोन्ही बाजूंनी बोलतात. आम्ही करतो उद्घाटन असे विरोधक बोलू लागले. दोन्ही बाजूंनी बोलतो चालतो त्याला काय म्हणतात? असा सवाल करत विरोधकांवर निशाणा साधला आहे.

### पुणे मेट्रोचे उद्घाटन लांबले म्हणून काहींनी छात्या बडवल्या - उपमुख्यमंत्री फडणवीस

ज्या लोकांनी आपल्या जीवनभरात एकही विकास काम केले नाही, ते लोकं पुणे मेट्रोच्या लोकार्पण सोहळा पुढे ढकलला गेला आणि लोकं अशा छात्या बडवत होते, असा हल्लाबोल भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर केला आहे. फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, तुम्ही काही तरी करुण दाखवा आणि मग छात्या बडवा असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावाला आहे. पुणे मेट्रोचे काम 2014 साली या कामाला गती मिळाली. पुणे मेट्रोचा पहिला टप्पा देशातील पहिला आहे ज्याने सर्वांत पहिले काम पूर्ण केले. पुण्याच्या वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यासाठी अजित पवार, चंद्रकांत पाटील यांनी चांगले काम केल्याचेही कौतुक फडणवीसांनी केले आहे.

# हिंमत असेल तर शहांनी मला संपवून दाखवावे - उद्धव ठाकरे



**प्रतिनिधी**
**नागपूर**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आज नागपुरातील रामटेक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी भाजप तसेच गृहमंत्री अमित शहा यांच्यावर देखील सडकून टीका केली आहे. अमित शहा म्हणजे अहमद शहा अब्दाली, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, काही दिवसांपूर्वी बाजारबुणगे इथे येऊन गेले. ते म्हणतात औरंगजेब संघटनेचे प्रमुख उद्धव ठाकरे. मी औरंगजेब तर तुम्ही कोण? तुम्ही तर अहमद शहा अब्दाली, अशी टीका ठाकरेंनी केली आहे. पुढे ते म्हणाले, काय नशीब आहे बघा, अमित शहा जिथे येऊन जातात नंतर तिथे मी येऊन यांना फटकारतो. अमित शहा म्हणतात उद्धव ठाकरेला संपवा. हिंमत असेल तर मैदानात या आणि छत्रपती शिवरायांच्या साक्षीने आम्हाला संपवून दाखवा, असा थेट इशाराच उद्धव ठाकरे यांनी दिला आहे.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, 25 ते 30 वर्ष आम्ही तुमच्यासोबत होतो. तेव्हा शिवसेनेची कधी भाजप झाली नाही, मग आता काय म्हणता शिवसेनेची काँग्रेस झाली? मला एकनाथ खडसेंचा फोन आला होता. तेव्हा जागावाटप अंतिम टप्प्यात आले होते.

पान 3 वर

### एकत्र आल्या नंतर कद्रुपणा करायचा नाही

*पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, एकत्र आल्या नंतर कद्रुपणा करायचा नाही. पाठीमागून वार करायचा नाही असे ठरवले आहे. रश्मी बर्वे यांना जात प्रमाणपत्र नाकारले. न्यायालयाने ते अवैध ठरवले. आता अवैध ठरवणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे असे ठाकरे म्हणाले. मालवणला वर्ष पूर्ण होण्याच्या आधी छत्रपतींचा पुतळा कोसळला. त्यातही पैसे खाल्ले असे ठाकरे म्हणाले. महाविकास आघाडीतील घटक पक्षांना झुंजवत ठेवून मुख्य शहरातील मोक्याचे भूखंडाचे श्रीखंड बावनकुळेंसारखे लोक खात आहे. आपले सरकार आल्यावर आपल्या माणसांना नवे भूखंड देऊ, असे ठाकरे यांनी सांगितले.*

## अखेर सहा दिवसांनी अक्षय शिंदेचा मृतदेह दफन

**ठाणे:** बदलापूर अत्याचार प्रकरणातीलआरोपी अक्षय शिंदेच्या मृत्यूला सहा दिवस झाले होते. तरीही त्याच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार झाले नव्हते. अक्षय शिंदेचा अंत्यविधी सोमवारपर्यंत करण्याची ग्वाही राज्य सरकारनं हायकोर्टात दिली होती. त्यामुळं अंत्यविधी करण्याचा आजचा शेवटचा दिवस होता. उल्हासनगर येथे अक्षय शिंदेचा मृतदेह दफन करण्यास स्थानिकांनी विरोध केला. त्यामुळं मोठ्या पोलीस बंदोबस्तात उल्हासनगर येथील शांतीनगर स्मशानभूमीत रविवारी अक्षय शिंदेचा मृतदेह दफन करण्यात आला.अंत्यविधीसाठी स्थानिकांनी केला विरोध : अक्षय शिंदेचा अंत्यविधी बदलापूरमध्ये करण्यास स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी विरोध दर्शवला. त्यानंतर, अक्षयच्या कुटुंबीयांनी अंबरनाथच्या स्मशानभूमीतील जागेची पाहणी केली होती. मात्र, अंबरनाथमध्ये देखील मनसे आणि शिवसेनेने त्याचा अंत्यविधी करण्यास विरोध दर्शवला.

पान 3 वर

### जम्मूमध्ये भाषणादरम्यान काँग्रेस अध्यक्ष खर्गे बेशुद्ध पडले

# ...जोपर्यंत मोदींना हटवणार नाही, तोपर्यंत जिवंत राहीन

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**



जम्मू-काश्मीरमधील कठुआ जिल्ह्यात एका सभेला संबोधित करताना काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे मंचावरच बेशुद्ध पडले. खर्गे काल कठुआ येथे प्राण गमावलेल्या हवालदाराला श्रद्धांजली अर्पण करत होते, तेव्हाच त्यांची तब्येत खालावली होती.

भाषण करताना खर्गे यांचा आवाज क्षीण झाला आणि ते अचानक बेशुद्ध झाले. त्यामुळे गर्दीत गोंधळ उडाला. मंचावर उभ्या असलेल्या लोकांनी त्यांना आधार देऊन बसवले. यानंतर त्यांचे बोलणे बंद झाले.

बरे झाल्यानंतर खर्गे पुन्हा मंचावर आले आणि म्हणाले की, मी 83 वर्षांचा आहे, पण मी इतक्या लवकर मरणार नाही. जोपर्यंत मोदींना हटवले जात नाही तोपर्यंत मी जिवंत असेन. मी तुमचे ऐकत राहीन. जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा यासाठी मी वकिली करत राहीन.

पान 3 वर



२ वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, सोमवार, ३० सप्टेंबर २०२४

## जीवदानी मंदिरात नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कडक सुरक्षा

**वसई :** पालघर जिल्ह्यातील विरारमधील सुप्रसिद्ध जीवदानी मंदिर नवरात्र उत्सवाच्या काळात भाविकांच्या आस्थेचे केंद्र बनते. या काळात हजारो भाविक देवीचे दर्शन घेण्यासाठी गडावर येतात, ज्यामुळे मंदिर प्रशासनाने सुरक्षा व्यवस्थेवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. मंदिर परिसरात १५० सिसिटीव्ही कॅमेऱ्यांची नजर ठेवण्यात येणार आहे, तसेच शस्त्रसज्ज पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे, असे मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष प्रदीप तेंडोलकर आणि उपाध्यक्ष पंकज ठाकूर यांनी सांगितले.सुरक्षेच्या दृष्टीने अँटी-टेरर स्क्वॉडने (ATS) मंदिराचा आढावा घेतला आहे आणि ठिकठिकाणी सुरक्षा तंत्र उभारण्यात आले आहे. पोलिसांसह विवा महाविद्यालयाचे २०० एनसीसी विद्यार्थी गर्दी व्यवस्थापनासाठी सज्ज असतील. फेनिक्युलर रेल्वेची चाचणीही यशस्वी झाल्याचे समजते.नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी ५०,००० भाविक मंदिरात येण्याची अपेक्षा आहे, तर रविवारी हा आकडा लाखाच्या घरात जाऊ शकतो. नवरात्र काळात भाविकांसाठी महाप्रसादाचे विनामूल्य वितरण केले जाणार आहे.



# थोडक्यात

### जास्त उत्पादनासाठी शेतीत बदल आवश्यक

**विरार:** आपल्याकडे शेतजमिनीचे प्रमाण कमी होत आहे. तसेच, मजूरही मिळेनासे झाले आहेत, यासाठी शेतकऱ्यांनी आता आपल्या पारंपरिक शेतीपद्धतीत बदल करायला हवेत. कमी जागेत जास्त उत्पन्न कसे मिळेल, हे पाहिले पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय केमिकल फर्टिलायझर्सच्या शेतीपत्रिकेचे व्यवस्थापकीय, संपादकीय समन्वयक मिलिंद आंगणे यांनी केले. ते वसई शेतकरी सोसायटीने शेतकऱ्यांसाठी आयोजित वसईतील शेतीविषयक मार्गदर्शन मेळाव्यात बोलत होते. शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय केमिकल्स अँण्ड फर्टिलायझर्स आणि महाराष्ट्र अॅग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शेती मार्गदर्शन शिबिराचे आयोजन संस्थेच्या सभागृहात आयोजित केले होते. संस्थेचे चेअरमन आशय राऊत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. संस्थेचे व्हाइस चेअरमन समीर पाटील यांनी सर्वांना स्वच्छतेची शपथ दिली. आंगणे यांनी सद्यस्थितीत शेतकरी करत असलेल्या शेतीत काय बदल करता येतील, त्यावर प्रबोधन केले. तसेच,'एक देश, एक खत' या संकल्पनेवर खताबाबत माहिती दिली. निमीष पवार यांनी युरिया खताबाबत असलेले गैरसमज दूर केले. नॅनो युरिया, निम कोटेड युरिया, फोम युरिया ही खते कशी वापरावीत, याची माहिती दिली.

### जनता दरबाराचे आज आयोजन

**पालघर:** सार्वजनिक बांधकाममंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (ता. ३०) सकाळी ११ वाजता जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील पहिल्या मजल्यावरील अप्पर जिल्हाधिकारी यांचे दालन क्र. १०९ येथे हा दरबार भरणार आहे. नागरिकांनी आपल्या समस्या व प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी जनता दरबारामध्ये उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी केले आहे.

### पितृपक्षानिमित्त किराणा वाटप

**मुंबई:** जोगेश्वरी पूर्वेतील अरविंद गंडभीर शाळेतील माजी विद्यार्थी किरण वैद्य, मुकेश नायक, हरिहर शिंदे, गणेश हिरवे या चौघांनी एकत्र येऊन पितृ पंधरवड्यानिमित्त विभागातील २० गोरगरीब, वंचित आणि सफाई कामगारांना किराणा किट दिले. माजी विद्यार्थी एकत्र येऊन दरवर्षी विविध समाजोपयोगी उपक्रम राबवित असतात. आपल्या उत्पन्नातील काही भाग हा समाजातील दुर्बल घटकांसाठी वापरता यायला हवा, असे आयोजकांनी सांगितले. तसेच, यापुढेही समाजासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून काय चांगले करता येईल, यासाठी आम्ही नक्कीच प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही दिली.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## वसई ग्रामीणमध्ये राजकीय उलथापालथ

# रमेश जाधव यांचा ठाकरे गटात पक्षप्रवेश; बहुजन विकास आघाडीला धक्का

प्रतिनिधी
■ वसई

वसई ग्रामीणमधील राजकारणात मोठी घडामोड घडली आहे. बहुजन विकास आघाडीचे माजी खासदार बळीराम जाधव यांचे चुलत बंधू आणि आदिवासी समाजातील महत्त्वाचे नेते रमेश पांडुरंग जाधव यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेना (ठाकरे गट) मध्ये प्रवेश केला आहे.



या पक्षप्रवेशामुळे बहुजन विकास आघाडीत मोठे राजकीय धक्के बसण्याची शक्यता आहे.

रमेश जाधव, जे महाराष्ट्र राज्य शिक्षक संघटनेचे अध्यक्ष आहेत, त्यांनी यापूर्वी बहुजन विकास आघाडीमध्ये विधानसभा लढवण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र, संधी मिळत नसल्याने त्यांनी अखेर ठाकरे गटात प्रवेश केला आहे. नुकतेच मातोश्रीवर त्यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह या पक्षात प्रवेश केला. त्यांच्या या प्रवेशामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाचा ग्रामीण भागातील प्रभाव वाढणार असल्याचे जाणकारांचे मत आहे.

येत्या निवडणुकीत रमेश जाधव यांना बोईसर मतदारसंघातून उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यांचा पक्षप्रवेश बहुजन विकास आघाडीच्या सध्याच्या आमदारांसाठी धोक्याची घंटा ठरू शकतो.

# वसईत नवरात्रौत्सवावर पावसाचे गडद सावट

## भाविकांच्या उत्साहावर पडणार विरजण?



प्रतिनिधी
■ वसई

वसई तालुक्यात सध्या नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जात आहे. देवीच्या उत्सवासाठी गावोगावी मंडप उभारले गेले असून, भक्तांच्या स्वागतासाठी आकर्षक रोषणाई केली आहे. विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे. मात्र, यंदा नवरात्रोत्सवावर पावसाचे सावट आहे.

वसई आणि आसपासच्या परिसरात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवसांतही पावसाची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे देवीची पूजन, गरबा, दांडिया, आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांवर पावसामुळे अडथळा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भाविकांमध्ये नवरात्रोत्सवाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचा उत्साह मोठा आहे, मात्र पावसामुळे कार्यक्रमांची वेळ आणि ठिकाणांमध्ये काही बदल करावे लागण्याची शक्यता आहे. काही मंडळांनी मंडपाचे छत अधिक मजबुत केले असून, पावसाचा फटका लागू नये यासाठी अतिरिक्त उपाययोजना केली जात आहे. अद्याप पावसामुळे मोठे नुकसान झाल्याचे वृत्त नाही,

# शिरसाड-वज्रेश्वरी मार्गाची दुरवस्था

## प्रवाशांना धोकादायक प्रवासाचा त्रास



प्रतिनिधी
■ वसई

मुंबई-अहमदाबाद महामार्गाला जोडणारा शिरसाड-वज्रेश्वरी राज्य मार्ग अत्यंत खडतर अवस्थेत आहे. सततच्या पावसामुळे रस्त्यावर मोठे आणि खोल खड्डे तयार झाले असून, त्यामुळे प्रवाशांना दररोज जीवघेणा प्रवास करावा लागत आहे.

या रस्त्यावर पावसाचे पाणी साचल्याने खड्डे आणखीनच धोकादायक बनले आहेत. वाहन चालकांना खड्डे चुकवत हळूहळू गाडी चालवावी लागत असून, त्यामुळे वाहनांची गती कमी होत आहे आणि परिणामी वाहतूक कोंडी निर्माण होते. विशेषतः मांडवी, चांदीप, पारोळ, शिरवली या गावांच्या परिसरातील रस्त्यांवर खड्ड्यांची संख्या अधिक आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने अनेक वेळा खड्डे बुजवण्याचे काम केले आहे, परंतु अवजड वाहतूक आणि वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे हे उपाय अपूर्ण ठरत आहेत. खड्डेमुळे प्रवासात होणारी अडचण विद्यार्थ्यांपासून कामगारांपर्यंत सर्वांनाच भेडसावत आहे. खड्डे चुकवताना होणारे अपघात आणि दुचाकीस्वारांचा समतोल बिघडून होणारी पडझड यामुळे स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत.

या समस्येवर तात्पुरत्या उपाययोजनांपेक्षा टिकाऊ डांबर किंवा काँक्रीटचा वापर करून खड्डे कायमस्वरूपी बुजविणे आवश्यक आहे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

*मुंबई: शिवसेना नेते युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेना शाखा क्रमांक 206 च्या वतीने केलेल्या आवाहनानुसार सिनेट निवडणुकी मध्ये युवा सेनेच्या पॅनलला मतदान करून 10 पैकी 10 उमेदवार विजयी केल्या बद्दल प्रभागातील सिनेट मतदारांना भेटून शिवसेना माजी नगरसेवक सचिन पडवळ तसेच शिवसेना शाखाप्रमुख हनुमंत बैजू हिंदोळे यांनी मिठाई देऊन त्यांचे आभार मानले.*



# नायगाव पूर्वेतील पर्यावरणाचा ऱ्हास; भूमाफियांकडून कांदळ वनाची नासधूस

प्रतिनिधी
■ वसई

नायगाव पूर्व परिसरात अनधिकृत माती भराव व बांधकामांच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात कांदळ वनाची कत्तल सुरू असून, या पर्यावरणविरोधी कृत्यांकडे महसूल विभाग आणि महापालिका दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. साई दुर्गा मित्र मंडळ या सामाजिक संघटनेने याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे आणि त्वरित कारवाईची मागणी केली आहे.

नायगाव पूर्वेतील स्टेशन परिसरात मोठ्या प्रमाणात कांदळ वनांची तोड केली जात आहे. गवत जाळण्याचे प्रकारही घडत असून, साई दुर्गा मित्र मंडळाने या घटनांकडे वसई-विरार महापालिकेचे लक्ष वेधले आहे. साई दुर्गा मित्र मंडळ या संस्थेने पूर्वी ५०० हून अधिक झाडे लावून त्यांचे संगोपन केले आहे, मात्र आता कांदळ वनाची नासधूस करून पर्यावरणावर घाला घालण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोप मंडळाचे अध्यक्ष चेतन घरत यांनी केला आहे.



भूमाफियांकडून कांदळ वन तोडून तिथे अनधिकृत बांधकामे उभारण्याचा डाव असल्याची शंका चेतन घरत यांनी व्यक्त केली आहे. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी झाडे लावण्याऐवजी त्यांची निर्दयी कत्तल करून ऑक्सिजन देणाऱ्या वृक्षांवर कुऱ्हाड चालवली जात आहे, हे अत्यंत धोकादायक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.महसूल आणि महापालिका विभागाच्या निष्काळजीपणामुळे स्थानिक पर्यावरणावर विपरीत परिणाम होत असल्याची खंत घरत यांनी व्यक्त केली आहे.

# महिला सशक्तीकरणासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा तिसरा टप्पा: लाखो भगिनींना मिळतोय लाभ!

प्रतिनिधी
■ मुंबई

महिला व बालविकास मंत्री आदिती वरदा सुनिल तटकरे यांनी आज सांगितले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभ हस्तांतरणाच्या तिसऱ्या टप्प्याला सुरुवात झाली आहे.

२५ सप्टेंबर रोजी ३४,३४,३८८ भगिनींना १५४५.४७ कोटी रुपये, दिनांक २६ सप्टेंबर रोजी



३८,९८,७०५ भगिनींना ५८४.८ कोटी रुपये आणि दिनांक २९ सप्टेंबर रोजी ३४,७४११६ भगिनींना ५२१ कोटी रुपये लाभ हस्तांतरित करण्यात आले आहेत. उर्वरित भगिनींना लाभ हस्तांतरणाची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू असून महिला व बालविकास विभाग यासाठी दिवस रात्र कार्यरत आहे. त्यामुळे सर्व पात्र महिलांना महिना अखेरपर्यंत लाभ मिळणार आहे.

ज्या महिलांना आधी लाभ मिळाला होता त्यांना तीसरा हफ्ता आणि ज्यांना आधी तांत्रिक अडचणींमुळे लाभ मिळाला नव्हता त्यांना यावेळेस तिन्ही हफ्ते एकसोबत देण्यात आले आहेत. या योजनेद्वारे महिलांच्या सक्षमीकरणास मोठा हातभार लागेल, याची खात्री आम्हाला आहे असं ही मंत्री आदिती वरदा सुनिल तटकरे म्हणाल्या.

# नानिवली येथे क्रांतिकारी हुतात्मा नाग्या महादू कातकरी स्मृतीदिनास विनम्र अभिवादन

प्रतिनिधी
■ पालघर

पालघर,नानिवली येथे दि.२५ सप्टेंबर रोजी संस्थापक अध्यक्ष रमेश सवरा यांच्या राहत्या घरी शूर झलकारी कातकरी एकता महासंघ महाराष्ट्र राज्य. संघटने मार्फत कार्यक्रम घेण्यात आला. या सभेत सर्व प्रथम प्रतिमेचे पूजन करण्यात आले.पालघर जिल्ह्यात अनेक गावातील कातकरी वस्तीत असलेल्या लोकांचा सहभाग होता. संघटनेचे संस्थापक व अध्यक्ष रमेश सवरा यांनी समस्या विषयावर चर्चा केली.व लोकांना मोलाचे असे बऱ्याच विषयांना धरून मार्गदर्शन करण्यात आले.

पालघर जिल्ह्यात कातकरी समाजाला भेडसावणाऱ्या समस्या कुपोषण, स्थलांतर, सुशिक्षित बेरोजगारांना कसा रोजगार मिळवून देता येईल, घरकूल योजना पासून वंचित घटक राहणार नाही. तसेच एक जिल्हा एक योजना उपक्रम राबवण्या वर चर्चा करण्यात आली. कातकरी समुदाय मागे राहू नये.



तसेच आराध्या दैवत क्रांतिकारक हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृती दिना निमित्त आज शूर झलकारी कातकरी एकता महासंघ महाराष्ट्र राज्य.संघटनेच्या मार्फत संघटना बांधणी करून तालुका कमिटी अध्यक्ष, गाव कमिटी अध्यक्ष यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्ती पत्र वितरित करण्यात आले.

सभेत उपस्थित शूर झलकारी कातकरी एकता महासंघ महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष रमेश सवरा, पालघर जिल्हा अध्यक्ष विजय शिसव, पालघर जिल्हा सचिव शिवराम मुकणे, उपाध्यक्ष रतीलाल आरडी, शिलिंग लहांगे, डहाणू तालुका अध्यक्ष गणेश गावित, सचिव दिलीप पवार, सहसचिव अनिश मिसाळ, सल्लागार देऊ गावित, काळूराम घाटाळ, तसेच पालघर तालुका कमिटी अध्यक्ष सुनिल पवार, सचिव किरण पवार, तसेच सर्व गाव कमिटी अध्यक्ष, सचिव, आणि सर्व कार्यकारणी सदस्य उपस्थित होते.

# मुंबई सेंट्रलमध्ये रक्तदान शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद



प्रतिनिधी
■ मुंबई

गोपाळ कृष्ण क्रीडा मंडळाच्या वतीने रविवारी (ता. २९) रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबीराला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

मुंबई सेंट्रल पश्चिमच्या ताडदेव येथील गोपाळ कृष क्रीडा मंडळाच्या माध्यमातून दरवषी नवरात्र उत्सव साजरा केला जातो. यंदा मंडळाचे ४६ वर्ष आहे. आज मंडळाच्या माध्यमातून रक्तदान शिबीर गोकुळधाम सोसायटीच्या पटांगणात आयोजित केले गेले होते. रक्तदान हे श्रेष्ठ दान मानून सोसायटीतील रहिवासी आणि स्थानिक परिसरातील नागरिक हे रक्तदान करण्यासाठी अंबेमातेच्या उत्सव मंडपात उपस्थित होते.

सकाळी १० ते दुपारी ३ या वेळात हा कार्यक्रम पार पडला. सर. जे. जे. महानगर रक्तपेढीच्या कर्मचाऱ्याची या रक्तदान शिबिरात मौलाची साथ होती. मंडळाच्या माध्यमातून सामाजिक बांधीलकी म्हणून हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून राबवला जात आहे. महिला, युवक, तरुणाने रक्तदान करून या सामाजिक उपक्रमात हात भार लावल्याचे मंडळाचे सचिव नितीन सानप यांनी सांगितले.

# मुलुंडमध्ये तपस्विनी सन्मान सोहळा

**मुंबई:** महाराष्ट्र सेवा संघ मुलुंडतर्फे तपस्विनी सोहळ्याचे आयोजन बुधवारी (ता. २) सायंकाळी सहा वाजता सेवा संघाच्या मुलुंड पश्चिमेतील सु.ल. गद्रे सभागृहामध्ये करण्यात आले आहे. भारतीय ऑलिंपिक चमूच्या मुलुंडवासी मार्गदर्शिका, राष्ट्रीय नेमबाजी संघ प्रशिक्षक दीपाली देशपांडे आणि क्रीडा पोषणतज्ज्ञ मिहिरा खोपकर यांच्याशी आहार व स्वास्थ्य विशेषज्ज्ञ डॉ. नितीन पाटणकर, क्रीडा पत्रकार पराग फाटक हे संवाद साधणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार आणि एआईआईएमएसचे अध्यक्ष पद्मश्री नेत्रतज्ज्ञ डॉ. विकास महात्मे हे उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी मोफत असून मुलुंडकरांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध ठिकाणच्या स्मारकांचे रखडलेले काम व विविध प्रश्नांवर 100 संघटना करणार आंदोलन

प्रतिनिधी
■ मुंबई

दादर शिवाजी पार्क येथील चैत्यभूमी शेजारी असलेल्या इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य दिव्य स्मारक होत आहे. पण स्मारकाचे काम अंत्यंत धीम्या गतीने होत आहे. राज्यातील विविध संघटना एकत्र येऊन या स्मारकाच्या निधी बाबतची माहिती तसेच स्मारक कधीपर्यंत पूर्ण होणार व चैत्यभूमी परिसर सुशोभिकरण या संदर्भात कोणत्याच आस्थापना कडून खरी माहिती दिली जात नाही. असे निदर्शनास आल्यानंतर झालेल्या ११० संघटनांच्या झालेल्या बैठकीत आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विविध सर्व संघटनेच्या वतीने इंदू मिल येथे सुरू असलेले शापूर्जी पालन जी यांच्या कामाचा दर्जा ? वापरण्यात येणारे बांधकाम साहित्य ? याचें परीक्षण करण्यात येत आहे का? ते कोणती संस्था करीत आहे? निर्माण निधी मध्ये होणारी सातत्याने वाढ? या बाबत कुणाचाही अंकुश असल्याचे दिसून येत नाही. इंदु मिल स्मारक निर्मनामध्ये अधिकारी व संबंधित प्रशासनाला मोठ्या प्रमाणात कुरण निर्माण झाल्याचे दिसते.

या सर्व प्रकारामुळे आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते संघटना अनुयायी यांच्या मनात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. असे प्रमुख समन्वयक विलास रूपवते आणि कामगार नेते व चैत्यभूमी व्यवस्थापक रमेश जाधव यांनी सांगितले. सिंधुदुर्गात वाऱ्याच्या वेगाने छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला. त्याचा अहवाल काल परवाच राज्य शासनाकडे सादर झाला आहे. त्यामध्ये असणाऱ्या बाबी या निष्काळजी पणाच्या द्योतक आहेत त्याची पुनरावृत्ती देशात किंबहुना महाराष्ट्रात होवू नये.अशी सर्वांचीच अपेक्षा आहे. आणि तीच अपेक्षा इंदूमिल बाबतींत तर निश्चितच आहे. संविधान शब्दावर देशाचं सरकार वर काय परिणाम झाला हे आपण पाहिले आहे.

या स्मारका मुळे किंवा मुद्यामुळे राज्य शासनाला त्याचे परिणाम भोगावे लागू नये. असे वाटते. असेही ते म्हणाले. एम.एम.आर.डी. ए. यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर त्यांच्या सूचनेनुसार मंत्रालयात घेतलेल्या बैठकीनंतर पुतळा सदोष असल्याने डॉ. राम सुतार यांच्या कला दालनात जाऊन सुरू असलेल्या कामाची पाहणी करून पुतळ्याचा दर्जा चांगला होण्यासाठी सूचना बदल करण्याच्यासाठी प्रत्यक्ष जाण्यावर चर्चा सुरु आहे. काही स्मारकाची सरकार दरबारी नोंद नसल्याचे दिसून येते आहे त्यात.१) डॉ बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांचे वास्तव्य असलेले बी. आय टी चाळ परेल .२) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे लग्न ज्या ठिकाणी झाले ते भायखळा मासळी बाजार.३) त्यागमूर्ति माता रमाई भीमराव आंबेडकर स्मारक वरळी .४) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेले साताऱ्यातील निवासस्थान (आमने बंगला) ५) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे प्राथमिक शिक्षण जेथे झाले. साताऱ्यातील प्रताप सिंह हायस्कूल.६) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या माता भिमाई स्मारक सातारा.७) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या माता भीमाई यांचे जन्मगाव आंबेटेबे मुरबाड.८) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव आंबडवे तालुका मंडणगड , जिल्हा रत्नागिरी येथील स्मारक .९)त्यागमुर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांचे मूळ गाव वणद ता.दापोली जिल्हा रत्नागिरी येथील स्मारकांचा समावेश आहे.

या संदर्भातील निवेदने राज्यपाल ,मुख्यमंत्री प्रशासक/आयुक्त मुंबई महानगरपालिका. मुंबई महानगर आयुक्त यांनाही देण्यात आले आहे.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 100**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १००**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

# आज पश्चिम रेल्वेवर चार तासांचा ब्लॉक

**मुंबई :** पश्चिम रेल्वेवरील गोरेगाव ते कांदिवली स्थानकांदरम्यान सहाव्या मार्गिकेचे काम करण्यासाठी सोमवारी रात्री १२.३० ते मंगळवारी पहाटे ४.३० वाजेपर्यंत गोरेगाव आणि मालाड स्थानकादरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावर ब्लॉक घेण्यात आला आहे. ब्लॉक कालावधीत अनेक लोकल रद्द करण्यात आल्या असून काही अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत. त्यानुसार विरारला जाणारी शेवटची चर्चगेट-विरार लोकल रात्री ११.२७ वाजता चर्चगेट स्थानकातून सुटेल. त्यानंतर चर्चगेट अंधेरी ही रात्री १ वाजताची शेवटची लोकल असेल. ब्लॉक कालावधीत जलद मार्गावरील लोकल चर्चगेट ते अंधेरी आणि विरार ते बोरिवली स्थानकांदरम्यान चालविण्यात येणार आहेत. तर अप आणि डाऊन मेल, एक्स्प्रेस अंदाजे १० ते २० मिनिटे उशिरा धावतील. या ब्लॉकमुळे ३० सप्टेंबर रोजी रात्री चर्चगेट स्थानकातून ११.२७ वाजता सुटणारी चर्चगेट ते विरार लोकल विरारला जाणारी शेवटची लोकल असेल. ही गाडी विरार येथे मध्यरात्री १.१५ वाजता पोहोचेल. तर, चर्चगेट ते अंधेरी लोकल चर्चगेटहून रात्री १ वाजता शेवटची लोकल सुटेल.



# मुंबईकरांचे आरोग्य निरोगी ठेवण्याकामी 'स्वच्छता मित्रां'चा मोलाचा वाटा

## पालिका आयुक्त गगराणी यांचे गौरवोद्गार

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगराला स्वच्छ व सुंदर राखून, मुंबईकरांचे आरोग्य निरोगी व सुदृढ ठेवण्याकामी स्वच्छता मित्रांचा मोलाचा वाटा आहे. स्वच्छता मित्रांचे आरोग्य सुस्थितीत राहिले तरच मुंबईकरांचे आरोग्य सुस्थितीत राहील. यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी वेळोवेळी आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन केले जाते. याद्वारे स्वच्छता कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याबाबत जागृती निर्माण होण्यास मदत मिळते, असे प्रतिपादन महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी केले.

केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार, पालिकेच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त १७ सप्टेंबर २०२४ ते दिनांक ०२ ऑक्टोबर २०२४ दरम्यान 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा राबवण्यात येत आहे. यावर्षी "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" ही संकल्पना अभियानात राबविण्यात येत आहे. या अंतर्गत पालिकेच्या २४ प्रशासकीय विभागात शनिवारी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी विभागनिहाय आरोग्य शिबिर भरवण्यात आले.

पालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्यासह विविध परिमंडळ उप आयुक्त, विभागाचे सहायक आयुक्त या अभियानात सहभागी झाले. स्थानिक बचत गटातील महिला, शालेय आणि महाविद्यालय विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, नागरिक संघ तसेच स्वच्छतादूत यांचा अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्वच्छतेची शपथ ग्रहण करत मुंबई स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संकल्प नागरिकांनी केला.

स्वच्छता कर्मचाऱ्यांनी आरोग्य शिबिराच्या माध्यमातून मोठ्या संख्येने प्राथमिक तपासणी करून घेतली. महानगरपालिका कर्मचाऱ्यांबरोबरच स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान अंतर्गत कार्यरत स्वयंसेवक, रस्ते स्वच्छता अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी कामगार - कर्मचारी, वाहन चालक यांनी देखील या शिबिरात आरोग्य तपासणी करून घेतली.



### ओला व सुका कचरा वर्गीकरण जनजागृती

*मुंबई मध्ये ओला कचरा व सुका कचरा वर्गीकरण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने, स्वच्छता ही सेवा या अभियान अंतर्गत विविध महाविद्यालयीन युवक - युवतींनी, शालेय विद्यार्थ्यांनी ठिकठिकाणी जनजागृती फेरी काढत सार्वजनिक स्वच्छता व कचरा व्यवस्थापनाचा जागर केला. तसेच घरोघरी जाऊन ओला कचरा, सुका कचरा वर्गीकरणाबाबत तसेच सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकण्याबाबत जनजागृती केली. महानगर स्वच्छतेला दिशा मिळत असताना मुंबईकर नागरिकांनीही स्वतःहून कचरा वर्गीकरण प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन जनजागृती फेरीच्या माध्यमातून करण्यात आले.*

# पवार साहेबांनी तुम्हाला शेंदूर लावला नसता तर अल्पच राहिला असतात...

## किशोरी पेडणेकरांचा हसन मुश्रीफांवर हल्लाबोल

प्रतिनिधी
■ मुंबई

"महाविकास आघाडीचे राज्य म्हणजे गद्दराना घरी बसवणे आणि खुद्दारांना सत्तेत बसवणे. ज्या वेळेला सत्ता होती तेव्हा कशी कामे अडवली जात होती, आणि आता त्यांना आठवतंय मी अल्पसंख्यांक आहे. अरे पवार साहेबांनी तुम्हाला शेंदूर लावला नसता तर अल्पच राहिला असतात, संख्या आमच्याकडे असती", असं म्हणत ठाकरे गटाच्या नेत्या किशारी पेडणेकर यांनी मंत्री हसन मुश्रीफांवर हल्लाबोल केलाय. त्या मुंबईतील सभेत बोलत होत्या.

शिवसेना नेते अजय चौधरी म्हणाले, समरजित घाटगे यांचा विजय 100 टक्के झाला समजा. एकदा जनतेने आशीर्वाद दिला तर त्याला थांबवायच्या ताकात कुणाकडे नाही. जेव्हा कोल्हापूरमध्ये महापूर आला राशन किट वाटप करण्यासाठी कोल्हापूरमध्ये गेलो होतो. कोल्हापूरमधले मुंबईत राहणाऱ्यांचे कुटुंबीयांनी आम्हाला सांगितले. मुंबईमध्ये शिवसेना आहे, बाळासाहेबांती शिवसेना आहे त्यामुळे मला काळजी वाटत नाही. महाराष्ट्राचे जनतेने निर्णय घेतला आहे, महाराष्ट्राची जनता तुमचा सुपडा साफ केल्याशिवाय गप्प बसणार नाही. काही करा यंदा कागलमध्ये हत्तीला गाढायचा म्हणजे गाढायचा आहे. भ्रष्टाचार करता करता आणि केसेस होता होता भाजप सोबत गेला, अशी टीकाही चौधरी यांनी केली.





# गणेश सलवदे राष्ट्रीय पुरस्कार 'भारतीय रत्न'ने सन्मानित

प्रतिनिधी
■ मुंबई

ग्लोबल फाउंडेशन यांच्या कडून आज यशदा ऑडिटोरियम, पुणे या ठिकाणी भारतातील विविध राज्यातून निवडण्यात आलेल्या सर्वच क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा नुकताच भारतीय रत्न पुरस्कार या नावाने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे क्रीडा क्षेत्रातील नावाजलेले मल्लखांबाचे पितामह म्हणून ओळखले जाणारे पद्मश्री पुरस्कार प्राप्त,उदय देशपांडे यांच्या हस्ते सर्व विजेत्यांचा सन्मान करण्यात आला.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कलेक्टर कॉलनी मनपा हिंदी माध्यमिक शाळा , चेंबूर मुंबई या ठिकाणी प्रभारी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेले गणेश पंडित सलवदे यांना शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिल्याबद्दल भारतीय रत्न पुरस्काराने (भारतीय ज्ञान रत्न ). उदय देशपांडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व शिक्षक मित्र परिवार , गावचे मित्र परिवार आणि सर्व शिक्षक गुरुजन मित्र यांचे, सलवदे परिवार यांनी शुभेच्छा दिल्याबद्दल आभार मानले आहे



पान ९ वरुन

## हिंमत असेल तर शहांनी मला संपवून दाखवावे - उद्धव ठाकरे

तेव्हा मला फोन करून सांगतात आपल्याला पुढे सोबत नाही जाता येणार, ही युती तोडावी लागेल. वरून तसे आदेश मिळाले आहेत. मी म्हणले ठीक आहे आणि नंतर तुमच्या साक्षीने निवडणूक लढवून जिंकून दाखवले. भाजपचे हे हिंदुत्व नाही, हे थोतांड आहे. आम्हाला दळभद्री गोमूत्रधारी हिंदुत्व मान्य नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले.
उद्धव ठाकरे म्हणाले, मी एका ठिकाणी गेलो होतो, तिथल्या एका महिलेला विचारले कसे चालू आहे, त्यावर त्या म्हणाल्या 1500 रुपयात काय होते? 1500 रुपयांत घर पण चालत नाही. मुलांचे शिक्षण 1500 रुपयात होणार आहेत का? असे म्हणत त्यांनी लाडकी बहीण योजनेवर देखील टीका केली आहे. मोदी-शहांची आम्हाला भीक नको आहे, आम्ही हक्काचे मागत आहोत. मी मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांची कर्जमाफी केली होती. पण तेव्हा मी अशा सभा घेत सगळ्यांना दाखवत नाही बसलो की मी कर्जमाफी केली, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमांवर लगावला आहे.

## ...जोपर्यंत मोदींना हटवणार नाही, तोपर्यंत जिवंत राहीन

जम्मूमध्ये खर्गे म्हणाले होते - जम्मू-काश्मीरचा राज्याचा दर्जा परत आणू मल्लिकार्जुन खर्गे यांनी 22 सप्टेंबर रोजी जम्मू येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा परत देणे ही काँग्रेसची प्राथमिकता आहे. ते म्हणाले की, राज्याला यापूर्वी कधीही केंद्रशासित प्रदेश बनवण्यात आले नव्हते. ते पुढे म्हणाले की, आम्ही पंतप्रधान मोदी आणि भाजपला विचारू इच्छितो की, तुमच्याकडे पूर्ण सत्ता असताना तुम्ही आजपर्यंत जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा का दिला नाही? जम्मू-काश्मीरसाठी काँग्रेसच्या जाहीरनाम्याचा संदर्भ देत खर्गे म्हणाले की, आम्ही राज्यासाठी सात आश्वासने दिली आहेत. आमचे पहिले वचन आहे की जम्मू आणि काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा बहाल केला जाईल. जम्मू-काश्मीरमध्ये 10 वर्षांनंतर विधानसभा निवडणुका होत आहेत. 2019 मध्ये कलम 370 हटवल्यानंतर ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये 90 विधानसभा मतदारसंघ आहेत, त्यापैकी 7 अनुसूचित जाती आणि 9 अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत.

## अखेर सहा दिवसांनी अक्षय शिंदेचा मृतदेह दफन

त्यानंतर, उल्हासनगर येथील शांतीनगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी खड्डा खोदण्यात आला. मात्र, येथेही स्थानिकांकडून विरोध करण्यात आला. अक्षय शिंदेच्या दफन विधीसाठी खोदलेला खड्डा येथील कार्यकर्त्यांनी बुजवला होता, त्यानंतर, पोलीस बंदोबस्तात पुन्हा हा खड्डा खोदण्यात आला. पोलीस आणि रुग्णालय प्रशासनानं रविवारी अक्षयच्या आई-वडिलांना त्याचा मृतदेह ताब्यात दिला. मृतदेह ताब्यात घेऊन शववाहिका उल्हासनगर दिशेनं निघाली. उल्हानगरमध्ये कडक पोलीस बंदोबस्तात अक्षयच्या मृतदेहाचे दफन करण्यात आले. मात्र, येथेही स्थानिकांनी स्मशानात धाव घेत अंत्यविधीला विरोध केला.बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेच्या एन्काऊंटर प्रकरणी, अक्षयच्या वडिलांनी न्यायालयात धाव घेतली होती. त्यामुळं, अक्षयच्या मृतदेहावरील अंत्यसंस्कार हा गुंतागुंतीचा विषय बनला होता.

# आज 'महाराष्ट्र विधानसभा-2024' विजय संकल्प संमेलन' मुंबईत

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात आज सोमवारी ३० सप्टेंबर २०२४ रोजी 'महाराष्ट्र विधानसभा - २०२४ विजय संकल्प संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. मुंबईतील दादर मधील वसंत स्मृती येथे सकाळी १० वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या उद्घाटकीय भाषणानंतर संमेलनात प्रामुख्याने केंद्रीय मंत्री भूपेंद्. यादव, किरण रिजुजू, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, व्ही. सतीश हे मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम व मोर्चा प्रदेशाध्यक्ष दिलीप कांबळे यांनी दिली.

'महाराष्ट्र विधानसभा - २०२४ विजय संकल्प संमेलन' मध्ये प्रदेश मोर्चा पदाधिकारी, अनू जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष , दोन महामंत्री, विधानसभा समन्वयक, सहसमन्वयक सहभागी होणार आहेत. या विजय संकल्प संमेलन' मध्ये मोठ्या संख्येने राज्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन ॲड. धर्मपाल मेश्राम व दिलीप कांबळे यांनी केले आहे.

# विधानसभेच्या 12 जागांबाबत तडजोड नाही : मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची ठाम भूमिका

प्रतिनिधी
■ मुंबई

येत्या विधानसभा निवडणुकीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने राज्यभरात पक्षाचे व जनसंघटनांचे मजबूत काम असलेल्या आणि प्रदीर्घ व यशस्वी लढे केलेल्या केवळ १२ जागांची मागणी महाविकास आघाडीकडे केली आहे. इतर डाव्या व पुरोगामी पक्षांनीही आपला प्रभाव असलेल्या मर्यादित जागांची मागणी केली आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते शरद पवार, जयंत पाटील, उद्धव ठाकरे, नाना पटोले, . बाळासाहेब थोरात यांची भेट घेऊन याबाबत आपली भूमिका दोन महिन्यांपूर्वीच स्पष्ट केली होती, आणि आपण लढणार असणाऱ्या १२ जागांची यादी या सर्व नेत्यांना तेव्हाच लिखित स्वरूपात सादर केली होती.

महाविकास आघाडीने या १२ जागा माकपला सोडाव्यात व त्यानंतरच उर्वरित जागांच्या बाबत आपसात वाटाघाटी कराव्यात अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केली होती. महाविकास आघाडीतील प्रमुख तीन पक्ष मात्र माकप व डाव्या पुरोगामी शक्तींना गृहीत धरून जागावाटपाबाबत आपसात चर्चा करत आहेत. इतर डावे पक्ष व पुरोगामी शक्तींना अद्याप या प्रक्रियेत सामावून घेण्यात आल्याचे दिसत नाही. महाविकास आघाडीच्या अंतर्गत एकजुटीसाठी हे घातक आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये सुद्धा महाविकास आघाडीने लोकसभेच्या महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व ४८ जागा तीन मुख्य पक्षांमध्ये वाटून घेतल्या व त्यानंतर इतर पक्षांच्या बरोबर त्यांचा केवळ पाठिंबा मिळवण्यासाठी चर्चा केली. माकपने तेव्हाही महाविकास आघाडीच्या प्रमुख पक्षांचे हे असे करणे चुकीचे असल्याबद्दल आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांच्या लक्षात आणून दिले होते. किमान विधानसभेच्या जागावाटपात तरी अशा प्रकारे आपसांत तीन पक्षांनी जागा वाटून घेऊन नंतर डावे पुरोगामी पक्ष व संघटनांबरोबर चर्चा सुरू करण्याची चूक होणार नाही याची काळजी घेण्याबद्दल विनंती केली होती. मात्र लोकसभेच्या वेळेस जे झाले तेच विधानसभेच्या वेळेस घडताना आज दिसत आहे. असे पक्षाने म्हटले आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, इतर डावे पुरोगामी पक्ष व विविध जनसंघटनांनी शेतकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी, युवक व महिलांच्या बाबतच्या विविध प्रश्नांवर सत्ताधारी भाजप व त्याच्या मित्रपक्षांच्या विरोधात वर्षानुवर्ष तीव्र संघर्ष केला आहे. जनतेच्या या संघर्षांमधून पुढे आलेल्या मागण्या व डावे पक्ष विविध प्रश्नांबाबत घेत आलेली धोरणे यांचे प्रतिबिंब महाविकास आघाडीच्या किमान समान कार्यक्रमात उमटावे असा आग्रहही पक्षाच्या वतीने महाविकास आघाडीच्या शिरस्त नेत्यांकडे लावून धरण्यात आला होता. मात्र याबाबतही कोणताही सकारात्मक प्रतिसाद अद्याप देण्यात आलेला नाही.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या पार्श्वभूमीवर जाहीर मागणी करतो की विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपाच्या प्रक्रियेत महाराष्ट्रातील सर्व डावे व लोकशाहीवादी पक्ष व पुरोगामी संघटनांना महाविकास आघाडीने तातडीने सामावून घ्यावे. निवडणूक लढण्याबद्दल त्यांचे आग्रह अत्यंत प्रामाणिकपणाने विचारात घेतले जाऊन सर्वसमावेशक भूमिका घ्यावी. मात्र तसे झाले नाही तर निर्माण होणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी डावे पक्ष व पुरोगामी शक्तींना गृहीत धरणाऱ्यांची असेल. असे राज्य सेक्रेटरी डॉ. उदय नारकर यांनी म्हटले.आहे.

# ठाकरे शिवसेना शाखा क्र.77 तर्फे गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

प्रतिनिधी
■ मुंबई

जोगेश्वरी.विधांसभा क्षेत्राचे संघटक, माजी नगरसेवक अनंत(बाळा) भि.नर, यांच्या वतीने तसेच शाखेच्या आयोजनाखाली प्रभाग क्र.७७ मधील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आल्या. वह्या वाटपाचा लाभ १००० हजार गरजू व होतकरू विद्यार्थ्यांनी कूपनच्या माध्यमातून घेतला.



या प्रसंगी जोगेश्वरी विधानसभा प्रमुख विश्वनाथ सावंत,विधानसभा अनंत(बाळा) भि.नर, रविंद्र साळवी(विधानसभा समन्वयक) दिलीप(बाळा) साटम, (उपविभाग प्रमुख) अमित पेडणेकर(युवासेना उप-सचिव) प्रियंका आंधळे(विधानसभा उपविभाग समन्वयक नंदकुमार ताम्हणकर(शाखाप्रमुख) उदय हेगिष्टे(शाखासमन्वयक) आदी उपस्थित होते.

यावेळी शामनगर विभागातील जेष्ठ शिवसैनिक मोहन गिरकर यांचा ७५ वा वाढदिवस शिवसेना शाखेच्या वतीने साजरा करण्यात आला.

# दुर्गापूजा, दिवाळी आणि छठ दरम्यान 6000 हून अधिक विशेष गाड्या धावणार

■ मुंबई

दुर्गापूजा, दिवाळी आणि छठ पूजेदरम्यान प्रवाशांच्या सुरळीत वाहतुकीसाठी भारतीय रेल्वेकडून यावर्षी 6000 हून अधिक विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत. या विशेष गाड्या 1 ऑक्टोबर ते 30 नोव्हेंबर दरम्यान चालवण्यात येणार आहेत. रेल्वे अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, रेल्वेकडून दरवर्षी सणासुदीच्या निमित्ताने विशेष गाड्या चालवल्या जातात. यंदा या विशेष गाड्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे.

दुर्गापूजा, दिवाळी आणि छठ या सणांमध्ये लाखो प्रवासी प्रवास करतात, हे विशेष. प्रवाशांच्या प्रचंड गर्दीला सुलभ आणि आरामदायी प्रवास देण्यासाठी रेल्वेने यावर्षीही विशेष गाड्या चालवण्याची तयारी केली आहे. दोन महिन्यांच्या कालावधीत, या विशेष गाड्या 6000 हून अधिक फेऱ्या करतील आणि मोठ्या संख्येने प्रवाशांना त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचवतील.

गेल्या वर्षी देखील भारतीय रेल्वेने मोठ्या संख्येने फेस्टिव्हल स्पेशल ट्रेन चालवल्या होत्या आणि या गाड्यांनी एकूण ४,४२९ फेऱ्या केल्या, ज्याद्वारे लाखो प्रवाशांना आरामदायी प्रवासाची सुविधा मिळाली. अर्थात, दरवर्षी दुर्गापूजा, दिवाळी आणि छठपूजेच्या निमित्ताने देशभरातून मोठ्या संख्येने लोक उत्तर प्रदेश आणि बिहारकडे जातात. उत्तर प्रदेश आणि बिहारमधील लोकांसाठी या सणांना केवळ धार्मिक महत्त्वच नाही, तर कुटुंबांना भेटण्याचाही एक महत्त्वाचा प्रसंग आहे. दरवर्षी सणासुदीच्या काळात प्रवाशांच्या गर्दीमुळे बहुतांश गाड्यांची तिकिटे दोन-तीन महिने आधीच प्रतीक्षा यादीत जातात. ही बाब लक्षात घेऊन यंदाही रेल्वेकडून सणासुदीच्या निमित्ताने विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. असे रेल्वेने म्हटले आहे.

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र. :-**
**का. अ. (शहर) / मुं.झो. सु.मंडळ/ ई-निविदा/ ४९/२४-२५**

कार्यकारी अभियंता शहरविभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडल (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक ) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४८४) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण १२ कामाकरीता बी - १ ( टक्केवारी ) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई-निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ http://mahatenders.gov.in वर उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक ३०.०९.२०२४ सकाळी १०.०५ पासून दिनांक ०७.१०.२०२४ सायंकाळी ५.३५ पर्यंत राहील. तसेच निविदा बैठकीचा दि. ०४.१०.२०२४, दुपारी ३.०० निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यारा फक्त http://mahatenders.gov.in, संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर) / मुं. झो. सु.मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (शहर),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

CPRO/A/815
Follow us: @mhadaofficial
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

**नवी मुंबई महानगरपालिका**
**सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग**
**निविदा सुचना क्र. नमुंमपा/अ.श.अ.(स्थापत्य)/17/2024-2025**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | वाशी विभागातील आंबेडकर गार्डन ते शबरी हॉटेल व जैन मंदिर ते महाराजा सोसायटी सेक्टर-9 येथे मलनि:सारण वाहिनी सुधारणा करणे. | रु.28,60,129/- |
| 2 | कोपरखैरणे प्रभाग क्र.40 मधील एम.एस.ई.बी. पासुन धारण तलावापर्यंत मलनि:सारण वाहिनीची सुधारणा करणे. | रु.76,48,091/- |
| 3 | ऐरोली विभागातील सेक्टर-1, समतानगर येथे नवीन मलनि:सारण वाहिन्या टाकणे. | रु.83,00,394/- |
| 4 | घणसोली विभागातील म्हात्रे आळी येथील चंद्रकांत म्हात्रे यांच्या घराजवळील परिसर, भवानी मंदिर परिसर, हनुमान मंदिर मागील परिसरात उर्वरित ठिकाणी नवीन मलनि:सारण वाहिनी टाकणे. | रु.1,01,86,462/- |

**या निविदेबाबतची विस्तृत माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संबंधीत निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.**

सही/-
**अतिरिक्त शहर अभियंता (स्थापत्य)**
**जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/478/2024 नवी मुंबई महानगरपालिका**

# रिपब्लिकन पक्षाचा 67 वा वर्धापन दिन सोहळा 3 ऑक्टोंबरला ऐतिहासिक सातारा नगरीत

## ना. रामदास आठवले यांनी दिली माहिती

प्रतिनिधी
■ मुंबई

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा यंदा 67 वा वर्धापन दिन असून हा वर्धापन सोहळा येत्या 3 ऑक्टोंबर 2024 रोजी दुपारी ३ वाजता ऐतिहासीक सातारा नगरीत तोफखाना येथील तालीम संघ मैदानात मोठया उत्साहात साजरा होणार आहे. या वर्धापन दिन सोहळयाचे उद्घाटन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांच्या हस्ते करण्यात येणार असून यावेळी प्रमुख अतिथी म्हणून साता-याचे खासदार उदयनराजे भोसले आणि आमदार शिवेंद्र राजे भोसले उपस्थित राहणार आहेत.

वर्धापन यावेळी अध्यक्षस्थानी रिपाइंचे राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे आणि स्वागताध्यक्ष पदी रिपाइंचे सातारा जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड राहणार आहेत. या सोहळयाचे निमंत्रक रिपाइंचे राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे आणि पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुर्यकांत वाघमारे असुन रिपाइंचे माजी मंत्री अविनाश महातेकर, कार्याध्यक्ष बाबुराव कदम , भूपेश थुलकर, विजय अगलावे, मोहन भोयर, सुरेश बार्शिंग, सिद्धार्थ कासारे, रमेश मकासरे, प्रकाश लोंढे, प्रकाश मोरे, मिलिंद शेळके, बाळाराम गायकवाड यासह राज्यभरातील सर्व प्रमुख पदाधिकारी ज्येष्ठ नेते या सोहळयास उपस्थित राहणार आहेत.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना 3 ऑक्टोंबर 1957 रोजी करण्यात आली. त्या प्रित्यर्थ दरवर्षी 3 ऑक्टोंबरला केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन पक्षाचा वर्धापन दिन दरवर्षी नित्यनियमाने साजरा केल्या जातो. यंदा रिपब्लिकन पक्षाचा वर्धापन दिन ऐतिहासीक सातारा नगरीत साजरा होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासीक सातारा नगरीत रिपब्लिकन पक्षाचा 67 वर्धापन दिन यंदा आयोजित करण्यात आला आहे.



या सोहळयाच्या प्रारंभी सता-यातील छत्रपती शिवाजी महाराज आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या पुतळयाला अभिवादन करुन तसेच येथील भिमाई स्मारकाला अभिवादन करुन रिपब्लिकन पक्षाच्या वर्धापन दिन सोहळयास प्रारंभ करण्यात येईल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजघराण्यातील वारस असणारे खासदार उदयनराजे भोसले आणि आमदार शिवेंद्र सिंह राजे भोसले यांना या सोहळयास प्रमुख अतिथी म्हणुन निमंत्रीत करण्यात आले आहे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साता-यातील प्रतापसिंह विद्यालयात इयता पहिलीत प्रवेश घेवून शिक्षण घेतले होते. त्या ऐतिहासीक आठवणींना सातारा शहराने जपुन ठेवले आहे. त्यामुळे ऐतिहासीक सातारा नगरीत रिपब्लिकन पक्षाचा 67 वर्धापन दिन सोहळा आयोजित करण्यात आल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी मुंबई येथील पत्रकार परिषदेत दिली. रिपब्लिकन पक्षाच्या वर्धापन दिन सोहळयास राज्यभरातील हजारो रिपब्लिकन कार्यकर्ते आणि आंबेडकरी अनुयायी उपस्थित राहणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन वर्धापन दिन सोहळयास सर्व जातीधर्मीय जनतेने उपस्थित राहण्याचे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले आहे.

परस्परांना हात द्यायचा असतो, हात दाखवायचा नसतो.



- अण्णा हजारे

वृत्तमानस

मुंबई, सोमवार, ३० सप्टेंबर २०२४

# परतीच्या पावसाचा संदेश

काही वर्षांपूर्वी पडणारा परतीचा पाऊस हवा हवासा वाटायचा. कारण तो इतका त्रास दायी, नुकसान करणारा, शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणणारा नव्हता. पण इकडील गेल्या काही वर्षांपासून तो शेतकऱ्यांचे भलतेच नुकसान करणारा ठरत आहे. हातावर पोट असणाऱ्यांना त्रास देत आहे. मुंबई सारख्या भागाला तुंबई करणारा ठरत आहे. येरे येरे पावसा, पैसा झाला या बालगीतापासून पाऊस सुरू होतो, असा यापूर्वीचा सर्वसाधारण समज. पण आता हा लहरी पाऊस कोणत्याही वेळी दणादणा कोसळून सर्वांची दाणादाण उडवतो. आता ना कुठे श्रावणामधील ऊन-पावसाचा मनोहारी देखावा पाहावयास मिळतो की झिमझिमने मनाला सुखावतो. हे सर्व दुर्मीळच झाले आहे. कारण पाऊसही आता एकसुरी किंबहुना एकसरी झालेला आहे. बर आपल्याकडील हवामान खातेसुद्धा सध्या गमतीचा विषय झाला आहे. या खात्याने पावसाचा लाल इशारा दिला की ऊन पडते आणि इशारा नसताना पाऊस झोडपतो. यावर मग समाजमाध्यमांवर मिम्सचा तुफान पाऊस पडतो. गेल्या काही दिवसांत परतीच्या पावसाने राज्यात सर्वत्र हाहाकार माजवला आहे. या पावसाने कधीही न थांबणाऱ्या महानगरी मुंबईला आपला तडाखा दाखवला. मुंबईची धमनी असलेल्या लोकलला अनेक तास ब्रेक लावल्याने चाकरमान्यांचे खूप हाल झाले. मुंबईमध्ये अनेक ठिकाणी अवघ्या काही तासांच्या पावसाने २०० मिलिमीटरचा टप्पा ओलांडला. ठाण्यातसुद्धा या परतीच्या पावसाचा परतावा अजूनही सुरू असून, त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचणे ही बाब आता नित्याचीच झाली आहे. त्यात वाहतूककोंडीही पाचवीला पुजलेली आहेच. पुण्यासह राज्यभरात अनेक ठिकाणी अत्यंत कमी कालावधीत १०० मिलीमीटरहून अधिक पावसाच्या नोंदी या वेळी झाल्या आहेत. विशेष म्हणजे सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील पाथरपुंज गावातील पावसाने तर यंदा चेरापुंजीशी स्पर्धा केली आहे. आधी कोरड्या राहिलेल्या मराठवाड्याच्या अनेक भागांत पावसाने पुरती दाणादाण उडवली. हीच स्थिती उत्तर महाराष्ट्र आणि खान्देशचीसुद्धा. विदर्भातसुद्धा तेच. पुण्यात तर सप्टेंबरच्या सरासरीच्या ७२ टक्के पाऊस अवघ्या दोन तासांत कोसळला. या पावसाने पिकांचे पुरते नुकसान केले आहे. काढणीला आलेल्या उभ्या पिकांना बसलेला फटका आधीच हवालदिल असलेल्या बळीराजासाठी खूप त्रासदायक ठरणार आहे. सोयाबीन, कांदा, भुईमूग, बाजरी, उडीद, कापूस या पिकांचे मोठे नुकसान झाले असून, राज्यभरातील सुमारे ३२ हजार ९९७ हेक्टर एवढे क्षेत्र गेल्या तीन दिवसांतील पावसाने बाधित झाल्याचा अंदाज आहे. त्यातही सर्वाधिक फटका मराठवाड्याला आणि तेथील सोयाबीनला बसला असल्याने सरकारने शेतकऱ्यांना वेळीच आर्थिक मदत केली नाही, तर आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढू शकते. सध्या तिन्ही प्रहर कधीही आणि कोणत्याही वेळेस कानठळया बसवणारा आणि मनात धडकी भरवणारा गडगडाट, डोळे दीपवणारा विजांचा कडकडाट असा खेळ आकाशाच्या पटलावर सुरू असल्याचे पाहावयास मिळते. हा नजारा सुरू झाल्यावर त्याला सध्या तरी परतीचा पाऊस सुरू झाला असे म्हणतात. भारतात साधारण जून ते सप्टेंबर या कालावधीत नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांचा प्रभाव दिसून येतो. एरव्ही सामान्यतः सप्टेंबरच्या मध्यावर वायव्य भारतातून म्हणजे राजस्थानातून मान्सूनच्या परतीचा प्रवास सुरू होतो. यालाच इंग्रजीत मान्सून विड्रॉवल असे म्हटले जाते. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार एखाद्या ठिकाणाहून मान्सूनची माघार घेतली आहे की नाही, हे ठरवण्याचे काही मापदंड असतात. त्यात पावसाचे प्रमाण तसेच वाऱ्याची दिशा याचा विचार केला जातो. यंदा ऑगस्ट महिन्यात हवामान खात्यानं मान्सून यंदा लवकर माघार घेईल, असा अंदाज व्यक्त केला होता. सप्टेंबरच्या मध्यापर्यंत मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू होईल, असं भाकीत करण्यात आलं होतं. पण आठवडाभरातच हवामान खात्यानं सुधारित भाकीत जाहीर केलं की, सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मान्सून सक्रिय राहील. वास्तविक सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात परतीच्या पावसाची लक्षणे दिसतात. पण २० ऑक्टोबरपर्यंत संपूर्ण देशात पाऊस हा हमखास असतो. खरेतर परतीच्या पावसाचा बदलता ट्रेंड बघण्यासाठी राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात अभ्यासाची गरज असली तरी त्याकडे अजूनही कोणी गांभीर्याने पाहात नाही. मुंबईमध्ये हवामान स्थितीबाबत माहिती देण्यासाठी सहा रडार असले तरी ते केवळ शोभेसाठी आहेत का, असा प्रश्न विचारावा वाटतो. पावसाने हाहाकार माजवल्यानंतर लाल इशारा देण्याचा प्रकार मुंबईत झाल्याने आपण नेमकी कोणती प्रगती केली, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. मुळात आपल्याकडे हवामान खाते व हवामानाबाबत असणाऱ्या एकूण अभ्यासाची वानवा आहे. गेल्या अनेक वर्षांच्या परतीच्या पावसाचा अभ्यास करून बघावे लागेल. पण सध्या या वर्षीच्या मान्सूनने १५ ते २० दिवसांचा विलंब लावला होता. त्यामुळे यंदा मोसमाच्या सुरुवातीला मान्सूनने वेळापत्रक मोडलेले दिसले. मे महिन्यात असनी चक्रीवादळाच्या प्रभावामुळे मान्सूनला गती मिळाली आणि तो वेळेआधीच अंदमानमध्ये दाखल झाला; पण तिथून मान्सूनचा प्रवास काही काळ रेंगाळला. मान्सूनच्या सुरुवातीला पावसाने दडी मारली. पण पुढील दीड ते दोन महिन्यांत पावसाने जणू सगळी कसर भरून काढली. सप्टेंबर महिन्यात तर राज्यात सर्वच जिल्ह्यांमध्ये अतिरिक्त पाऊस झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे यंदाच्या मोसमातल्या एकूण सरासरी पावसाची आकडेवारी समाधानकारक दिसते. राज्यात यंदा बहुतांश जिल्ह्यांमध्ये एक तर सरासरीएवढा किंवा सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. उत्तर भारतात गंगा नदीच्या खोऱ्यात तसेच ईशान्य भारताच्या काही भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. तर दक्षिण भारतात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. किनारी प्रदेशात बहुतांश ठिकाणी सरासरीएवढा पाऊस झाला आहे. या लहरी पावसाचा फटका केवळ शेती आणि समाजजीवनाला बसत नाही तर देशाच्या अर्थव्यवस्थेलासुद्धा बसतो. शेतीप्रधान देश अशी आपली अर्थव्यवस्थेची ओळख आहे. शेती हा अजूनही निवडणूक आणि मत यापलीकडे नेहमीच सर्व राजकीय पक्षाकडून दुय्यम विषय मानला गेला आहे. त्यामुळे शेती व पीक क्षेत्र घटत आहे. भविष्यात आपल्याला अनेक घटकांसाठी आयातीवर अवलंबून राहावे लागू शकते. त्यासाठी पीक पद्धतीत व्यापक बदल करावे लागणार आहेत. ते करताना शेतकऱ्यांना विश्वासात घ्यावे लागणार आहे. बदलत्या हवामानाचा योग्य अभ्यास करण्याची सक्षम यंत्रणा उभारून त्याचा फायदा शेती व शेतकऱ्यांसाठी वेळीच केला पाहिजे. त्याचबरोबर पावसाळ्यापूर्वीच काय ठोस उपाययोजना करता येतील, याबाबतचा पडताळा शेतीप्रमाणेच शहरांच्या व्यवस्थापनातही घ्यायला हवा आहे. हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढीवरील अभ्यासकांकडून या मुद्द्यावरही व्यापक अभ्यास, प्रयोग आणि सातत्यपूर्ण संशोधनाची अपेक्षा आहे अन्यथा निसर्गाच्या आणि पावसाच्या या लहरी खेळात आपले सर्वांचे यापुढे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. आधुनिक तंत्रज्ञान प्रचंड प्रगतशील होत असताना निसर्गाकडून होणारे नुकसान मात्र आपण थांबू शकत नाहीत. निसर्ग बिघडण्यास कुठेतरी आपणच कारणीभूत आहोत. त्या निसर्गाचा सन्मान आपण केला नाही त्याचे नियम आपण पाळले नाहीत त्यामुळे तो अधून मधून आपले रौद्ररूप दाखवतो. निसर्गाचा सन्मान केला त्याचे नियम पाळणे तर तो आपला सन्मान करेल असा साधा विचार मात्र आपण करू शकत नसलो तर अधून मधून तो आपल्याला नुकसान देतच राहणार. अवकाळी पावसाचा सुनामी असं चक्रीवादळ असो अथवा भूस्खल असो असे धक्के तो आपल्याला देतच राहणार आहे. त्यामुळे निसर्गाची मानवाकडून होणारी प्रचंड आणि रोखण्याची मोठी जबाबदारी इथल्या शासकीय यंत्रणेची आहे. सरकारची आहे. ही जबाबदारी त्यांनी पाळावी हेच हा परतीचा पाऊस सांगतो आहे

# माजी नगरसेवकांना लागले विधानसभा निवडणुकीचे वेध

महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी भारत निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार तसेच निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ.सुखबीर सिंह संधू यांचे शिष्टमंडळ मुंबई भेटीला आले होते. त्यांच्या या शिष्टमंडळाने शनिवारी समुद्र किनाऱ्यालगत असलेल्या पंचतारांकित ट्रायडेंट हॉटेल येथे आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीचा आढावा विविध अंमलबजावणी यंत्रणांकडून घेतला. मुख्य सचिव, तसेच सर्व संबंधित यंत्रणांच्या प्रमुखांकडून त्यांनी सविस्तर माहिती घेतली. विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्यासमवेत चर्चा करून त्यांच्या सूचनाही आयोगाने घेतल्या. त्यानतंर घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी राज्यातील मतदारांची आकडेवारी सादर केली. मतदानात जास्तीत जास्त मतदारांनी भाग घेऊन मतांची टक्केवारी वाढविण्याचे त्यांनी आवाहन राज्यातील मतदारांना केले. मुख्य निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी मुंबईत येऊन गेल्यामुळे राज्यात विधानसभा निवडणूक लवकरच होईल यात कुणाला शंका राहिली नाही. केंद्र व राज्य सरकारने राज्यात विधानसभा निवडणूक घेण्याबाबत आयोगाला हिरवा कंदील दाखवला हे ही यातून स्पष्ट झाले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जशा लांबल्या तशा विधानसभेच्या ही निवडणुका किमान सहा महिने तरी लांबून राज्यात २६ नोव्हेंबर पासून राष्ट्रपती राजवट लागू होईल अशी साधार भीती व्यक्त होत होती. पण केंद्र व राज्य सरकारने, काय होईल ते होईल निवडणुक घेऊन टाकूयाच, असा प्राथमिक विचार केलेला दिसतो आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री महोदय एकनाथ शिंदे यांनी १५ दिवसांपूर्वी नोव्हेंबरच्या दुसऱ्या अठवड्यापर्यंत निवडणुका होतील असे सूतोवाच केल्यानंतर सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले. महायुती व महाआघाडीत जागावाटपाची बोलणी सुरू झाली आहे. या दोन्ही आघाडीत अनेक पक्ष असल्यामुळे जागावाटप हे काही एका बैठकीत होणारे नाही.हे ओघाने आलेच.. . त्यामुळे आतापर्यंत आमचे जागावाटप कोणतेही रुसवे फुगवे, राग लोभ न ठेवता खेळी मेळीच्या वातावरणात पार पडले आहे. असे सांगण्यासाठी कोणी नेता पुढे आलेला दिसत नाही. मात्र त्यांच्यातील लगबगीने आता जोर धरल्यास नवल नाही.

तासेबतर राजकीय पक्षांनी प्रचाराला गणेशोत्सवातच सुरुवात केल्याचे दिसून आले. प्रत्येक पक्षाने आपापल्या परीने होल्डिंग्स, बॅनर, फलक लावून प्रचार केला होता. आता ३ ऑक्टोंबर पासून सुरू होणाऱ्या नवरात्रोत्सवात ही तसेच चित्र दिसेल. यात शंका नाही. पण याच दरम्यान बहुधा आदर्श आचारसंहिता लागू झालेली असेल त्यामुळे या प्रचारावर त्याची किती छाप पडते हे पाहावे लागेल. त्यानतंर दसरा, दिवाळीतही मतदारांना चोरी चूपके खुश करण्याचेही प्रयत्न केले जातील. एकंदरीतच विधानसभेची ही निवडणूक दिवाळीच्या आनंदात अधिक उत्साह निर्माण करणारी ठरेल. यात शंका वाटत नाही.

**माजी नगरसेवक उत्सुक**

विधानसभा निवडणूक होणार आहे. या वार्तेने अनेकांना आनंदाचे भरते आलेले असेल. तर प्रस्थापित राजकीय पक्षांनी तयारीचा जोर वाढवला असेल यात वाटाघाटी , व्ह्युवरचना, कोण, कुठे, कसा उमेदवार द्यायचा, कोणाला पडायचे, कुणाचे वर्चस्व गाडायचे याचे डावपेच आखले जात असतील. पण गेल्या ३-४ वर्षापासून पालिकेची निवडणूक कधी होईल याची वाट पाहत बसलेले काही माजी नगरसेवक विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसले आहेत. काही माजी नगरसेवकांना आपल्या वाटेतील अडसर दूर झाल्याने त्यांना संधी प्राप्त झाली आहे. तर काहींनी पक्ष बदलला तरी व त्यांची इच्छा असूनही विधानसभा निवडणूक लढवता येणार नाही. याचे दुःख त्यांना आहे. या निवडणुकीत खासदार असताना पक्षाने पुन्हा तिकीट दिले नसल्याने तेही आणि ज्यांनी लोकसभा निवडणूक लढवून पराभव पत्करला तेही विधानसभा निवडणूक लढवायच्या तयारीत आहेत. गेल्या दोन अडीच वर्षात राज्यात बरेच राजकीय वादळ माजलेले आपण पाहिले आहे. विशेषतः शिवसेना फुटल्यानंतर मुंबईतून जे आमदार शिंदे गटात गेले. त्यांच्या रिक्त झालेल्या जागांवर तेथील



**महापालिकायन**

सुनील शिंदे

मोबाईल नंबर–९८२१९९६११७

उध्दव ठाकरे गटाच्या नव्या दमाच्या चेहऱ्यांना चांगली संधी प्राप्त झाली आहे. अन्यथा वर्षानुवर्षे पक्षाने त्याच त्याच व्यक्तीला उमेदवारी दिल्याने त्यांचा प्रचार करावा लागत होता. यावेळी मात्र त्या मतदार संघातले चित्र बदललेले दिसेल. याचे दुसरे कारण म्हणजे काँग्रेस पेक्षा शिवसेना उध्दव ठाकरे गटातील माजी नगरसेवक मोठ्या प्रमाणात शिंदे गटात गेले आहेत. त्यामुळे त्यांची विधानसभा निवडणूक लढवण्याची संधी गेली आहे. पण जे माजी नगरसेवक शिंदे गटात गेले आहेत.

त्यांनाही विधानसभा किंवा पुढच्या वर्षी होणाऱ्या पालिका निवडणुकीची उमेदवारी हवी आहे. या बोलीवरच त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. पण यातील अनेक नगरसेवकांना इच्छा असूनही त्यांच्या मतदारसंघात भाजपचे किंवा आपल्याच शिंदे गटाचे आमदार असल्यामुळे त्यांना विधानसभा निवडणूक लढवता येत नाही.त्यामुळे त्यांना पालिकेची सार्वत्रिक निवडणुकीची वाट पाहावी लागेल. पण त्यावेळचे चित्र काय असेल हे आताच सांगणे कठीण असल्यामुळे या माजी नगरसेवकांचे भविष्य टांगलेले दिसत आहे.

**हे आहेत इच्छुक माजी नगरसेवक?**

जोगेश्वरी पूर्व मतदार संघात शिवसेना उध्दव ठाकरे गटातील माजी नगरसेवक अनंत (बाळा) नर यांना लॉटरी लागण्याची चिन्ह दिसत आहेत. तेथील शिवसेनेचे आमदार रवींद्र वायकर हे शिंदे गटात गेल्यामुळे व आता खासदार झाल्यामुळे अनंत नर यांना संधी उपलब्ध झाली आहे. तसेच भाजपच्या माजी जेष्ठ नगरसेविका उज्ज्वला मोडक व प्रिती सातम याही तेथून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत.तशीच परिस्थिती भायखळा लोकसभा मतदार संघात निर्माण झाली आहे. तिथल्या विद्यमान शिवसेनेच्या आमदार यामिनी यशवंत जाधव व त्यांचे पती माजी नगरसेवक यशवंत जाधव हे दोघेही शिंदे गटात गेल्याने तिथे माजी नगरसेवक मनोज जामसुतकर व रमाकांत रहाटे या उबाठा च्या माजी नगरसेवकांना संधी प्राप्त झाली आहे. हे दोघेही विधानसभा निवडणूक लढवण्यास उत्सुक आहेत. मुलुंड मध्ये विद्यमान आमदार मिहिर कोटेचा हे आहेत. कोटेचा यांनी ईशान्य मुंबईतून नुकतीच लोकसभा निवडणूकही लढवली होती. त्यात ते पराभुत झाले. त्यामुळे त्यांना पुन्हा विधानसभेची उमेदवारी मिळणार नाही अशी अटकळ काही भाजप नगरसेवकांनी बांधली आहे त्यामुळे मुलुंड विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढविण्यास पालिकेतील माजी भाजपा गटनेते प्रभाकर शिंदे, प्रकाश गंगाधरे , नील किरीट सोमय्या आणि लोकसभा निवडणुकीत पुन्हा उमेदवारी न मिळालेले मनोज कोटक हे इच्छुक असल्याचे बोलले जाते. मनोज कोटक भांडुप विधानसभा मतदारसंघात सुद्धा निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. त्यांनी २०१४ मध्ये भांडुप मधून निवडणूक लढवली होती पण त्यावेळी त्यांचा पराभव झाला होता. घाटकोपर पूर्व हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. तिथे विद्यमान भाजपा आमदार पराग शहा आहेत. पण तेथून भाजपचे माजी नगरसेवक प्रवीण छेडा, तसेच भाजप मधून गेली पाच वर्षे विजनवासात गेलेल्या प्रकाश मेहता यांनाही उमेदवारी हवी असल्याचे समजते. मागाठाणे येथील शिवसेनेचे आमदार प्रकाश सुर्वे हे शिंदे गटात गेल्याने तिथे उध्दव ठाकरे गटाचे माजी नगरसेवक योगेश भोईर इच्छुक आहेत. तर गोरेगांव मतदार संघात शिवसेनेचे ज्येष्ठ नेते सुभाष देसाई यांच्या ऐवजी माजी नगरसेवक समीर देसाई यांनी तयारी चालवली आहे. सायन कोळीवाडा मतदारसंघात विद्यमान भाजप आमदार तमिल सेलवन आहेत. पण तरीही तेथून भाजपच्या माजी नगरसेविका राजश्री शिरवडकर या उमेदवारी मिळविण्याच्या प्रयत्नात असल्याचे समजते. तर काँग्रेस चे माजी विरोधी पक्ष नेते, बेस्ट समिती मध्ये १८ वर्षे सदस्य राहिलेले रवी राजा हेही तिथून इच्छुक आहेत. वडाळा मतदारसंघातून काँग्रेस चे तरुण तडफदार माजी नगरसेवक सुफीयान वनु,अंधेरी पश्चिम मतदारसंघातून माजी नगरसेवक मोहसिन हैदर, हेही निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. चांदिवली चे विद्यमान आमदार शिंदे गटाचे दिलीप मामा लांडे हे आहेत तरीही तिथून भाजपचे माजी नगरसेवक हरीश भद्रिंगे हे इच्छुक असल्याचे समजते. वरळी मतदार संघातून भाजप नगरसेविका कृष्णावेनी रेड्डी या निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. तेथे तमिळ मतदार मोठ्या संख्येने असल्यामुळे त्यांना उमेदवारी हवी आहे.मुंबादेवी येथून माजी नगरसेवक अतुल शहा, अंधेरी पूर्व येथून मुरजी पटेल हे भाजपचे माजी नगरसेवक इच्छुक आहेत. मालाड मधून पालिकेतील भाजप गटाचे माजी नेते विनोद मिश्रा तसेच माजी नगरसेवक आणि मुंबई भाजप चे अध्यक्ष अँड आशिष शेलार यांचे भाऊ विनोद शेलार हेही इच्छुक आहेत तसेच दोन वेळा खासदार म्हणून उत्तर मुंबईतून निवडून आलेल्या पण नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत गोपाळ शेट्टी यांना पुन्हा उमेदवारी देण्याचे नाकारून बाहेरच्या उमेदवाराला तिथे उमेदवारी देण्यात आली. गोपाळ शेट्टी हे मालाड विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढविणार असल्याचे समजते.वर्सोवा विधानसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाचे यशोधर फणसे पुन्हा यावेळीही उभे राहण्याची शक्यता आहे.तर या मतदारसंघात. यावेळी भाजप नव्या चेहऱ्याला संधी देण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.मलबार हिल मतदार संघात भाजपचे विद्यमान आमदार व मंत्री मंगलप्रभात लोढा हे असल्याने शिंदे गटाचे माजी नगरसेवक व विद्यमान विभागप्रमुख दिलीप नाईक तसेच दहिसर मतदारसंघात भाजपच्या विद्यमान आमदार मनीषा चौधरी असल्यामुळे शिवसेना ठाकरे गटातून सर्वात प्रथम फुटून शिंदे गटात प्रवेश करणाऱ्या शितल म्हात्रे यांची विधानसभा निवडणूक लढविण्याची संधी हुकली आहे. मनसेचा बरखास्त झालेल्या पालिकेत एकच नगरसेवक होता आता तोही सक्रिय राहिलेला नाही. मात्र त्यापूर्वी झालेले नगरसेवक संदीप देशपांडे, मनीष घुरी, स्नेहल जाधव, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या पालिकेतील माजी गटनेत्या राखी जाधव आदी निवडणूक लढविण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जाते. सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत ४ नगरसेवक निवडून आले होते. व ते आमदार झाले होते. शिवसेनेच्या भायखळा येथून यामिनी जाधव, चांदिवली येथून दिलीप मामा लांडे व भांडुप येथून रमेश कोरगावकर तर घाटकोपर पूर्व येथून भाजपचे पराग शहा निवडून आले होते. या २०२४ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत कोणत्या माजी नगरसेवकांना उमेदवारी मिळते या कडेच सध्या सर्वांचे लक्ष लागले आहे. घोडा मैदान जवळ आहे.

## पत्र मानस

### अर्थमंत्र्यांविरोधात कारवाई अनपेक्षित

देशाची अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि केंद्रीय यंत्रणा यांच्याविरोधात कर्नाटक येथे कायदेशीर म्हणजेच न्यायालयीन कारवाई सुरू झालेली आहे. विषय आहे निवडणूक रोखे. भारत सरकारची निवडणूक देणगी कायदेशीर योजना म्हणजे निवडणूक रोखे योजना होय. निवडणूक दरम्यान देणगी घेणारा आणि देणारा यांच्यामधील आर्थिक व्यवहार हा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या माध्यमातून पण इलेक्टोरल बाँण्डसच्या स्वरुपात होत होता. लोकशाही असल्याने देणगी देणारी व्यक्ती अथवा उद्योग संस्था यानी कोणाला व किती देणगी देणार या सर्व बाबी देणगीदाराच्या मूलभूत अधिकारात येतात पण सर्वोच्च न्यायालयाने अशाप्रकारच्या देणग्यामुळे माहितीच्या अधिकाराचे उल्लंघन होत असल्याचे सांगून ही योजनाच रद्द केलेली आहे. या योजनेचा सर्वाधिक फायदा सत्ताधारी भाजपालाच झाल्याचे आरोप विरोधकानी केला आहे. म्हणूनच बंद झालेल्या या योजनेचा केंद्र सरकाराच्या विरुद्धातील आताची न्यायालयीन कारवाई अनपेक्षित व निरर्थक वाटत आहे.

**- संजय गंगाराम साळगांवकर, मुंबई**

### वंदे भारत ट्रेन, पांढरा हत्ती होऊ नये?

भारतीय रेल्वेचा चेहरा मोहरा बदलण्याचा प्रयत्न केंद्रीय रेल्वे विभागाने वंदे भारत च्या मार्फत केला. एका मागोमाग एक, एकाचवेळी अनेक मार्गांवर वंदे भारत ट्रेन सुरु केल्या जात आहेत. या ट्रेनचे भाडे व्हीआयपी ट्रेनपेक्षाही जास्त आहे. सुरुवातीला काही रुटवर सुरु करण्यात आलेली वंदे भारत ही प्रिमिअम ट्रेन आता जवळपास ६६ मार्गांवर सुरु करण्यात आल्या आहेत. परंतू, या ट्रेनचे भाडेच एवढे आहे की ती सर्व सामान्य प्रवाशी वर्गाला परवडणारी नसल्याने काही मार्ग हे तोट्यात चालले आहेत.रेल दुनियाच्या वेबसाईटवर वंदे भारतच्या ट्रेनही माहिती येते यानुसार काही मार्गांवर वंदे भारत एकदम फुल होत आहेत तर काही मार्गांवर वंदे भारतला ट्रेन ला प्रवासीच मिळत नाहीत अशी स्थिती आहे. या ट्रेन पांढरा हत्ती ठरू लागल्या आहेत. भुवनेश्वर-विशाखापट्टणम, टाटानगर-ब्रह्मपूर, रीवा-भोपाळ, कलबुर्गी-बेंगळुरू, उदयपूर-आग्रा/जयपूर, दुर्ग-विशाखापट्टणम, नागपूर-सिकंदराबाद आदी मार्गांवर तर निम्म्यापेक्षा जास्त सीट रिकाम्याच राहू लागल्या आहेत .देशातील प्रमुख शहरांना, राज्यांना इंटरसिटीसारखे जोडण्याचे काम वंदे भारतने केले आहे. उद्योगधंदे असलेली शहरे, धार्मिक स्थळे असलेली शहरे आदी भाग या वंदे भारतद्वारे जोडण्यात येत आहेत. मुंबई, गोवा, दिल्ली, कोलकाता, चेन्नई, बेंगळुरू, बनारस, पुणे या शहरांतून या वंदेभारत ये-जा करतात. असे असले तरी यामध्ये विमानासारखी प्रिमिअम सेवा आहे. अगदी मुंबई-पुणे असा वंदेभारतने प्रवास करायचा असल्यास ट्रेन येण्यापूर्वी पण तिकिटे उपलब्ध असतात अशी मुंबई पुणे वंदे भारत ट्रेन ची परिस्थिती आहे. या मार्गावरील वंदे भारत ट्रेन लोकांच्या सोईची आहे, तसेच ती बहुतांश वेळा प्रवाशांनी भरलेली असते. भविष्यात लोकांच्या हितार्थ सुरु केलेली वंदे भारत पांढरा हत्ती होण्या पूर्वी तिकीट दरात कपात करून , दिव्यांगांना व ज्येष्ठ नागरिकांना सुद्धा राखीव कोठा ठेऊन त्यांना रेल्वे तिकिटात सवलत दयावी जेणेकरून वंदे भारत ट्रेन पांढरा हत्ती होण्यास नक्कीच रेल्वे प्रशासनाला रोखण्या करता यश येईल आणि वंदे भारत ट्रेन चा पूर्णपणे उपभोग रेल्वे प्रवासी यांना उपभोगणे सोपे जाईल.

**- नितीन कदम, दादर**

### विश्वस्त सर्वपक्षिय असावेत

प्रभादेवी येथील सुप्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरावर विश्वस्ताच्या यादीवर नजर टाकल्यास फक्त सत्ताधारी पक्षाच्या लोकानाच स्थान देण्यात आले आहे.वास्तविक सिद्धिविनायक मंदीर हे सर्व भाषिक, सर्व हिंदू राजकीय पक्षातील लोकाचे श्रद्धास्थान आहे. कोणत्याही मंदिरावर सत्तेत असलेल्या लोकांचीच विश्वस्तपदी वर्णी लावणे गैर आहे.सत्ताधारी पक्षाचे नेतेच विश्वस्तपदी का?मंदिरात राजकारण आणू नये.सत्ताधारी पक्षाच्या कारभारावर लक्ष ठेवण्यासाठी विरोधी पक्षातील काही जागा या विश्वस्त पदावर असाव्यात.सत्तेत येणा-या कोणत्याही पक्षानी याची अमलबजावणी करायला धर्मादाय आयुक्तानी भाग पाडावे.

**- अरुण पां.खटावकर, लालबाग**

### कोणाला मत द्यायचे?

विधानसभा निवडणुकीत राज्याची सत्ता कोणाच्या हाती द्यायची हे मतदार ठरवतात. मतदाराच्या समोर दोन शिवसेना,दोन राष्ट्रवादी, भाजप, कॉग्रेस, मनसे व वंचित बहुजन आघाडी असे आठ मुख्य राजकीय पक्ष आहेत. राज्यातील गलिच्छ राजकारणावर मतदार नाराज आहे.प्रत्येक पक्ष निवडणुकीत आपल्या पक्षाला जास्तीत जास्त जागा जिंकण्यासाठी प्रयत्न करताना इतर पक्षांच्या जागाही पाडतो.जास्तीत जास्त जागा मिळाल्यावर त्या पक्षाला सत्ता स्थापन करण्याची व मुख्यमंत्रीपदाची संघी मिळते.राजकीय पक्ष राज्याची सत्ता काबीज करण्यासाठी मतदाराचा अपमान करीत कोणत्याही युती किंवा आघाडीत सामिल होतात.मतदारांना आता प्रश्न पडला आहे अशा परिस्थितीत कोणाला मत द्यायचे? कोणताही पक्ष विश्वासू राहिलेला नाही. मतदारांच्या अशा प्रश्नचिन्हामुळे मतदान कमी होणार व विधानसभेला कोणत्याही पक्षाला बहुमत मिळणार नाही.

**- विवेक तवटे, ठाणे**

### सहन ही होत नाही आणि..

.मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत युवासेनेचे यश हे अधिक लक्ष"वेधी" आहे कारण,आता काही दिवसांतच विधानसभेचे "वेध" सुरू होणार आहेत. लोकसभेतील महाविकास आघडीच्या सरशी नंतर युवासेनेचे हे यश तरुणांचा कल कुठल्या दिशेने आहे हे ठरवितो.आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या युवासेनेचे सर्वच उमेदवार निवडून आले.अभाविप करीता हा क्रिकेटच्या भाषेत बोलायचे झाले तर "व्हाईट वॉश" आहे.आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या निवडणुकीमुळे आदित्य यांचे नेतृत्व अधिक सक्षम आणि युवावर्गाला भुरळ घालणारे आहे हे सिद्ध झाले आहे.हा युवावर्ग पूर्वी भारतीय विद्यार्थी सेना आणि राज ठाकरे यांच्याकडे आकर्षित होता.परंतु महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या निवडणुकीत सहभाग घेतला नसल्याने त्या मागची कारणे नव निर्माण यांनाच माहीत असावीत.भयगंडाने किंवा पराभवाच्या भीतीने मुंबई पालिकेच्या निडणुका लोंबकळत ठेवणाऱ्या आणि मुंबईचा कारभार नगरसेवक नसल्याने गैरसोयीचे करणाऱ्यांना हा मुंबईतील लोकसभेपाठोपाठ पदवीधर युवकांनी दिलेला ठोसा आहे. युवासेनेचे हे यश आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने लक्षवेधी आहे. भाजपाची अवस्था "सहन ही होत नाही आणि सांगता ही येत नाही" अशी झालेली आहे.भाजपाच्याच भाषेत बोलायचे झाले तर "ये तो सिर्फ झांकी है विधानसभा बाकी है"

**- दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

*भाईंदर (पूर्व) साईबाबा नगर मध्ये तीव्र पाणी समस्या निर्माण झाली आहे. या संदर्भात ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक अनंत आंगचेकर आणि इतर स्थानिक रहिवासी यांनी स्थानिक माजी नगरसेवक दिनेश नलावडे यांच्यासह मिरा -भाईंदर महापालिका आयुक्त संजय काटकर आणि उपायुक्त (जल व्यवस्थापन) शरद नानेगावकर यांच्या भेटी घेऊन त्यांना निवेदन दिले व चर्चाही केली.*



## म ह त्वा चे

### काचेच्या पेटीखाली दबून चौघांचा मृत्यू

**पुणे :** पुणे शहरातील येवलेवाडी येथील कारखान्यात मोठी दुर्घटना घडली असून यात चौघांचा मृत्यू झाला आहे. येवलेवाडी येथील काचेच्या कारखान्यात गाडीतून काचा उतरवताना काचेच्या पेटीखाली काही कामगार दबले गेले. यात चार कामगारांचा मृत्यू झाला. मृत्यू झालेले चारही कामगार उत्तर प्रदेशातील रहिवाशी असल्याची माहिती समोर आली आहे. पुण्याच्या येवलेवाडी येथील इंडिया ग्लास या काचेच्या कंपनीत ही दुर्घटना घडली. दुपारी दीडच्या सुमारास काचेचा माल उतरवत असताना काचा फुटल्या. काचेच्या पेटीखाली काही कामगार अडकले असल्याची माहिती येथील कोंढवा भागातील अग्निशामक दलाला मिळाली होती. त्यानुसार अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी दाखल होताच अग्निशामक दलाच्या जवानांनी बचावकार्य सुरू केले. यावेळी सहा कामगार काचेच्या पेटीखाली दबले गेले होते. यातील सर्व कामगारांना बाहेर काढले. मात्र यातील चार जण गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित करण्यात आले.

### विभाग प्रमुख संतोष गुरव यांना मातृशोक



**लांजा :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लांजा तालुक्यातील शिवसेना विभाग प्रमुख संतोष शंकर गुरव यांच्या मातोश्री श्रीमती राधिका शंकर गुरव वय ८७ वर्षे याचे रविवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी पहाटे ५.३५ वाजता गोळवशी,खांबड वाडी येथील राहत्या घरी निधन झाले. संतोष गुरव गोळवशीचे माजी सरपंच आहेत.तसेच, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लांजा तालुक्यातील विभाग प्रमुख आहेत.. लोकांच्या अडी अडचणीत मदतीला धावून जाणे हा त्यांचा स्वभाव आहे.त्यांच्या मातोश्रींच्या निधनाची माहिती मिळताच लांजा तालुक्यातील शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिक यांनी गोळवशी येथे येऊन मातोश्रींचे दर्शन घेतले व शोक व्यक्त केला.गावातील सर्व वाडी वस्त्यांवर शोक व्यक्त करण्यात आला.गुरव यांच्या मातोश्री आपल्या घरी येणारांची मायेने विचारपूस करीत असत त्यांच्या सुस्वभावी वर्तणुकीबद्दल त्या लोकप्रिय होत्या.गोळवशी ग्रामविकास सेवा समितीचे अध्यक्ष बाबू गुरव यांनी गुरव कुटुंबियांचे सांत्वन केले व शोक व्यक्त केला. त्यांच्या पश्चात तीन मुलगे,एक विवाहित मुलगी,सुना,नातवंडे असा परिवार आहे.

### मद्यधुंद कार चालकाची तीन कारला धडक

**छत्रपती संभाजीनगर :** आज मध्यधुंद कार चालकाने भरधाव वेगाने कार आणत घरासमोर उभ्या असलेल्या दोन ते तीन कारला जोरदार धडक दिली. धडक दिल्यानंतर कारमधील पाचही जण फरार झाले असून सुदैवाने या घटनेत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. छत्रपती संभाजीनगर शहरातील एन टु भागात हि घटना घडली आहे. शहरात सलग दुसऱ्या दिवशी सुसाट कारने धडक दिल्याचा प्रकार घडला आहे.

# पाटण तालुक्यातील लोकनेते बाळासाहेब देसाई बहुउद्देशीय कृषी संकुलाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

**प्रतिनिधी**

**पाटण**

पाटण तालुक्यातील काळोली येथे उभारण्यात आलेल्या लोकनेते बाळासाहेब देसाई बहुउद्देशीय कृषी संकुल तालुका बीज गुणन केंद्राच्या पहिल्या टप्प्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. पश्चिम महाराष्ट्रातील उत्तम शेतकरी प्रशिक्षण केंद्र म्हणून लोकनेते बाळासाहेब देसाई बहुउद्देशीय कृषी संकुल नावारूपास येईल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला.



यावेळी आयुष मंत्रालय व आरोग्य व कुटुंब कल्याण केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधीक्षक समीर शेख, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, कृषी सहसंचालक उमेश पाटील, लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष यशराज देसाई, जिल्हा कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माती परीक्षण प्रयोगशाळा, धान्य व स्वच्छता प्रतवारी केंद्र, डाळ प्रक्रिया केंद्र, तेल घाणा केंद्र व भात प्रक्रिया केंद्राची पाहणी केली. जिल्ह्यातील दुर्गम भागात पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या संकल्पनेतून १६.३३ हेक्टर क्षेत्रावर काळोली येथे बहुउद्देशीय कृषी संकुल उभारण्यात आले. या बहुउद्देशीय संकुलासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून ४९८ लक्ष रुपये खर्चास मंजुरी मिळाली असून त्यापैकी ४९१ लक्ष रुपये वितरित करण्यात आले आहेत. या संकुलाच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शेतकऱ्यांना प्रक्षेत्रावर विविध पिकाचे प्रात्यक्षिक स्वरूपात असलेले निवासी प्रशिक्षण, वेगवेगळ्या प्रक्रिया उद्योगांचे प्रशिक्षण आणि माती परीक्षण या सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

या कृषी संकुलात तालुका बीज गुणन केंद्र काळवली प्रक्षेत्रावर १२.२० हेक्टर लागवडीलायक क्षेत्र असून सध्या या क्षेत्रावर भात, सोयाबीन, ऊस आणि रब्बी ज्वारी या पिकांचे बीजोत्पादन घेतले जाते. पाटण तालुक्यात पिकांच्या लागवडीसाठी पोषक हवामान आहे. येथे भात सोयाबीन, ऊस, भुईमूग, सूर्यफूल या पिकांची लागवड करण्यात येते.

कृषी संकुलामध्ये २०० आसन क्षमता असलेले सुसज्ज शेतकरी प्रशिक्षण केंद्र आहे. या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण देण्यासाठी कृषी, उमेद, महिला आर्थिक विकास महामंडळ, ग्रामविकास विभाग यांची शेतकरी तसेच महिला बचत गटासाठी प्रशिक्षणांचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून दरवर्षी सुमारे दहा हजार शेतकरी या कृषी संकुलास भेट देतील. कृषी संकुलामध्ये पीक उत्पन्न वाढीसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या माती परीक्षण प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. याच्या माध्यमातून दुर्गम भागातील शेतकऱ्यांना माती नमुने तपासण्यासाठी जिल्हास्तरावर यावे लागणार नाही. या बहुउद्देशीय कृषी संकुलामध्ये पहिल्या टप्प्यात धान्य प्रतवारी केंद्र, तेलघाणा औणि भात गिरणीचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रक्रिया केंद्रामध्ये शेतकऱ्यांना भाडेतत्त्वावर धान्याची प्रतवारी करणे भुईमूग, सूर्यफूल इत्यादीचे तेल तयार करणे आणि भात कांडून देणे या सुविधा उपलब्ध आहेत. ही केंद्रे शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी यांचे मार्फत कार्यान्वित करण्यात येतील. या प्रक्रिया केंद्रांमुळे दुर्गम भागातील युवकांना कृषी प्रक्रियेबाबत माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

काळोलीच्या बीज गुणन केंद्रावर ऊस संशोधन केंद्र पाडेगाव येथील ऊस प्रात्यक्षिके उपकेंद्राच्या माध्यमातून घेणे प्रस्तावित असून तसा प्रस्ताव महात्मा फुले कृषी विद्यापीठात देण्यात येणार आहे. यामुळे पाटण आणि लगतच्या तालुक्यातील उसाचे उत्पादन वाढण्यासाठी उत्तम बियाणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात येईल. या संकुलाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये शेतकरी निवासस्थान, उपहारगृह, शीतगृह या सुविधा प्रस्तावित असून जिल्हा वार्षिक योजनेतून त्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.



*मीरा रोड : टीम युवा ब्रिगेड, मीरा भाईंदर यांच्या नेतृत्वाखाली ॲड. रवी व्यास, महेश शेट्टी टेलर आणि सच्चिदानंद शेट्टी, मुनालाईगुट्टू यांचा काल मीरा रोड येथे एक विलक्षण सत्कार आणि सांस्कृतिक कार्यक्रम झाला. माजी खासदार गोपाळ शेट्टी यांच्या अनुकरणीय योगदानाची ओळख या उत्सवाने केली, ज्यांनी आपल्या देशावर महत्त्वपूर्ण प्रभाव पाडला. या कार्यक्रमाला मंगळूरचे माजी खासदार नलिन कुमार कटील, गिरीश शेट्टी टेलर, भास्कर शेट्टी काशिमीरा, हेमंत म्हात्रे, संघटक सरचिटणीस यांच्यासह अनेक मान्यवर पाहुणे उपस्थित होते त्यांच्या सहभागाने हा प्रसंग खऱ्या अर्थाने समृद्ध झाल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली. पाहुण्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.*

### मेट्रोच्या उद्घाटन सोहळ्याचा खर्च मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या मानधनातून घ्यावा



**पुणे :** काँग्रेस पक्षाचे आमदार रविंद्र धंगेकर यांनी मेट्रो उद्घाटन सोहळ्यावरून सत्ताधारी पक्षावर टीका केली. ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी पुण्यातील मेट्रो प्रकल्पाच्या उद्घाटन आणि भूमिपूजन सोहळ्यास आजवर ६ वेळा आले आहे. त्यामुळे यापुढील काळात एकाच प्रकल्पाचे किती वेळा उदघाटन करायचे, याबाबत सर्व पक्षांनी मिळून आचारसंहिता तयार करण्याची वेळ आली आहे. तसेच दोन दिवसापूर्वी एस. पी कॉलेजच्या मैदानावर उदघाटन सोहळा आयोजित करण्यात आला होता. मात्र मुसळधार पावसामुळे तो कार्यक्रम होऊ शकला नाही. त्या कार्यक्रमासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला होता. त्यानंतर आज गणेश कला क्रीडा रंगमंच येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन सोहोळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाला देखील लाखों रुपयांच्या जाहिराती आणि इतर खर्च हा कोट्यावधी रुपयांमध्ये जाणार आहे. त्यामुळे या दोन्ही कार्यक्रमांचा खर्च मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या मानधनातून घ्यावा अशी मागणी धंगेकर यांनी केली.

# मराठ्यांना बाजूला ठेवणे तुमची घोडचूक असेल; सरकारला मराठा समाजाला आरक्षण द्यावे लागेल

## मनोज जरांगेंचा अमित शहांना ईशारा



**प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्र दौऱ्यावर असताना आम्ही अनेक आंदोलने हाताळली आहेत. त्याप्रमाणे राज्यातील मराठा आंदोलनही व्यवस्थित हाताळू, असे म्हटले होते. यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी अमित शाह यांचा खरपूस समाचार घेतला आहे. सरकारला मराठा समाजाला आरक्षण द्यावे लागेल. तुम्ही मराठा समाजाला आरक्षण दिले, तर तुम्हाला सत्ता मिळवण्यापासून कुणीही रोखू शकणार नाही. पण मराठ्यांना बाजुला ठेवले तर तर ती तुमची घोडचूक असेल. मराठ्यांच्या पाठिंब्याविना कोणीही सरकार स्थापन करू शकत नाही, असा इशारा जरांगे यांनी दिला आहे.

मनोज जरांगे यांनी उपोषण सोडल्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णालयात उपचार घेत आहेत. रविवारी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी मनोज जरांगे म्हणाले की, अमित शाह आणि देवेंद्र फडवणीस याना मराठ्यांना आरक्षण द्यावे लागेल. धनगर आणि धनगडचा आदेश काढणार असाल, तर मराठा आणि कुणबी एकच आहेत, असा आदेशही काढायला काहीच हरकत नाही. हा आदेश निवडणुकीआधीच काढावा, असे ते म्हणाले.

मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांच्या वक्तव्यावरही भाष्य केले. भुजबळ यांच्या आवाहनाप्रमाणे आम्ही निवडणुकीत जागा निवडून आणल्या, तर ते त्यांचे आरक्षण सोडून मराठा समाजाला आरक्षण देतील का? ते राजकारण सोडतील का? गोरगरिबांचा करत असलेला विरोध, जातीय तेढ निर्माण करणारी वक्तव्ये बंद करणार का?, मराठ्यांना ओबीसी कोट्यातून आरक्षण असतानाही तुम्ही त्याला विरोध करत आहात. हे सर्व तुम्ही थांबवणार का? असे अनेक प्रश्न मनोज जरांगे यांनी यावेळी केले.

***अमित शहांना कत्तली करायच्या आहेत का?***

*पुढे बोलताना जरांगे म्हणाले की, राज्यात प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे आणि बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे भाजप वाढली. त्याआधी राज्यात भाजप नव्हते. तुमच्यासोबत काम करणाऱ्यांना उद्धव ठाकरेंना तुम्ही दूर लोटले आणि एका बांगलादेशी बाईला देशात आणले. अमित शहा यांना कत्तली करायच्या आहेत का? असा सवालही जरांगे यांनी अमित शहा यांना केला आहे. पुढे ते म्हणाले की, यांना दादागिरी करून सत्ता मिळवायची आहे. पण जनतेने राजकीय एन्काउंटर केला, तर तुम्ही दिसणार नाही, अशा शब्दांत जरांगेंनी टीका केली आहे.*

# 5500 नागरिकांनी केला सायन-पनवेल महामार्ग व ठाणे-बेलापूर मार्ग चकाचक

## नवी मुंबई पालिकेचे सखोल स्वच्छता अभियान







**प्रतिनिधी**

**नवी मुंबई**

नवी मुंबई हे दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाचे शहर असून सायन पनवेल महामार्ग हा अत्यंत महत्वाचा व वर्दळीचा रस्ता शहरातून जातो. या महामार्गाचे सर्वाधिकार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असले तरी या रस्त्यावर स्वच्छता असावी व नवी मुंबईचा स्वच्छ शहर नावलौकिक कायम रहावा यादृष्टीने महानगरपालिका नेहमीच सतर्क असते.

याच अनुषंगाने 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत आयोजित करावयाच्या स्वच्छताविषयक विविध उपक्रमांमध्ये आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सायन पनवेल महामार्गाची सखोल स्वच्छता मोहीम राबविण्याचे प्राधान्याने निर्देश दिले व त्यासोबत ठाणे बेलापूर मार्ग या शहरातील आणखी एका वर्दळीच्या मार्गावरही सखोल स्वच्छता मोहीम राबविण्याचे निश्चित करण्यात आले.

त्यानुसार आज रविवारच्या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी स्वच्छता मोहीमेत व्यापक प्रमाणात लोकसहभाग लाभेल या भूमिकेतून या दोन्ही महत्वाच्या मार्गांच्या दुतर्फा स्वच्छता मोहीमेचे नियोजन करण्यात आले. 17 सप्टेंबरपासून स्वच्छता ही सेवा पंधरवड्यात दररोज आयोजित करण्यात येणा-या स्वच्छताविषयक उपक्रमांनी प्रेरित झालेल्या 5 हजार 500 हून नवी मुंबईकर नागरिकांनी आज महापालिका अधिकारी, कर्मचारी व स्वच्छताकर्मींसमवेत सायन पनवेल महामार्ग व ठाणे बेलापूर मार्गावर यशस्वीरित्या सखोल स्वच्छता मोहीम राबवली.

विशेष म्हणजे डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा, अलिबाग यांचे 2700 हून अधिक श्रीसदस्य हे पद्मश्री, महाराष्ट्रभूषण डॉ.अप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ.सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली या महामार्ग सखोल स्वच्छता महामोहीमेत सक्रिय सहभागी होते.

सकाळी 7 वाजल्यापासून सुरू झालेल्या या सखोल स्वच्छता महामोहीमेचे व्यवस्थित नियोजन करण्यात आले होते. वाशी, तुर्भे व सानपाडा, जुईनगर, नेरूळ, बेलापूर या विभाग कार्यालयांच्या हद्दीत येणा-या सायन पनवेल महामार्गाच्या स्वच्छता मोहीमेत महापालिका अधिकारी-कर्मचारी, स्वच्छतामित्र तसेच डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे श्रीसदस्य यांना महामार्गावरील क्षेत्र वाटप करून देण्यात आले होते. यांच्यासमवेत त्या त्या विभागांच्या हद्दीतील नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक, स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी व सदस्य, एनएसएसचे विद्यार्थी, युवक मोठ्या संख्येने उत्स्फुर्तपणे आपापल्या विभागात सहभागी झाले.

बेलापूर व नेरूळ भागातील सायन पनवेल महामार्गाची स्वच्छता करणा-या दोन्ही समुहांनी उरण फाटा येथे एकत्र येत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्यासमवेत अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड व सर्व विभागप्रमुखांसमवेत स्वच्छतेची शपथ घेतली आणि प्रत्यक्ष स्वच्छता कार्याला सुरूवात झाली. नेरूळ विभागाच्या समुहाने जुईनगरच्या दिशेने तसेच बेलापूर विभागाच्या समुहाने कोकण भवनच्या दिशेने सायन पनवेल महामार्गाच्या दुतर्फा स्वच्छताकार्याला सुरूवात केली.

अशाच प्रकारे सर्व आठही विभागांमध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व संतोष वारूळे तसेच परिमंडळ 1 उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ 2 उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली विभाग कार्यालयांना स्वच्छता क्षेत्र वाटून देण्यात आले होते. अशा सर्व ठिकाणी स्वच्छता शपथ घेऊन मोहीमेस प्रारंभ करण्यात आला. महामार्गाची स्वच्छता करताना रस्त्यांच्या व पदपथांच्या कडेला पावसामुळे वाढलेले गवत काढून टाकण्यात आले तसेच आपोआप वाढलेली रानटी झाडांची रोपेही काढून टाकण्यात आली. याशिवाय अग्निशमन वाहनाव्दारे प्रक्रियाकृत पाणी फवारून रस्त्यांच्या कडेला जमा झालेला धूळीचा चिखलही साफ करण्यात आला. जेणेकरून हा चिखल नंतर सुकून त्याची धूळ तयार होऊन प्रदूषणात वाढ होऊ नये.

इतक्या मोठ्या संख्येने शहरातील मोठे मार्ग स्वच्छ करण्यासाठी दुतर्फा लोक उतरल्याने नवी मुंबईत स्वच्छतेची एक मोठी चळवळ उभी राहिल्याचे चित्र अनुभवयाला मिळाले. या मार्गांवरून प्रवास करणारे प्रवासीही सुरू असलेल्या स्वच्छता मोहीमेकडे कुतुहलाने बघत होते. काही खाजगी वाहनचालकांनी आपली वाहने थांबवून छायाचित्रे काढत मोहीमेची प्रशंसाही केली.


'स्वच्छता ही सेवा' मोहीमेतील प्रत्येक कार्यक्रमाला मिळणारा नागरिकांचा मोठ्या प्रमाणावरील उत्साही प्रतिसाद नवी मुंबईकरांची एकता आणि स्वच्छतेविषयीची बांधिलकी दर्शविणारा असून त्याबद्दल नवी मुंबईकर नागरिकांचे आभार व्यक्त करीत 2 ऑक्टोबर रोजी स्वच्छता ही सेवा मोहीमेच्या नियोजित सांगता समारंभामध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# रिपब्लिकन गोल्डमॅन अंकुश गायकवाड यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीची हानी - ना. आठवले

**प्रतिनिधी**

**डोंबिवली**

'रिपब्लिकन गोल्डनमन' म्हणून प्रसिद्ध असणारे रिपब्लिकन पक्षाचे डोंबिवली शहर अध्यक्ष अंकुश गायकवाड यांचे आज पहाटे डोंबिवलीतील लोटस रुग्णालयात वयाच्या 63 व्या वर्षी दुःखद निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी आणि बहीण असा परिवार आहे. अंकुश गायकवाड हे अत्यंत प्रामाणिक निष्ठावंत कार्यकर्ते होते. दिलदार ईमानदार गोल्डनमन अंकुश गायकवाड हे वीनम्र स्वभावाचे सोन्या सारखा माणूस होता त्यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीची ; रिपब्लिकन पक्षाच्या चळवळीची मोठी हानी झाली आहे अशा शब्दांत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष



केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना रामदास आठवले यांनी दिवंगत अंकुश गायकवाड यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे.

दिवंगत अंकुश गायकवाड अनेक वर्ष रिपब्लिकन पक्षात केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांच्या नेतृत्वाशी एकनिष्ठ राहिले.अंकुश गायकवाड यांच्या निधनाची दुःखद वार्ता कळताच संपूर्ण मुंबई ठाणे प्रदेशात रिपब्लिकन चळवळीत दुःख हळहळ व्यक्त करण्यात आली. कल्याण डोंबिवलीत रिपब्लिकन चळवळीवर दुःखाचा डोंगर कोसळला अशी शोककळा डोंबिवलीतील रिपब्लिकन चळवळीत पसरली.

दिवंगत अंकुश गायकवाड यांच्या पार्थिवावर डोंबिवलीत स्मशानभूमीत बौध्द पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. गायकवाड यांच्या अंत्ययात्रेत रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र सरचिटणीस गौतम सोनवणे; जेष्ठ नेते अण्णासाहेब रोकडे ,पँथर नेते दयाल बहादुरे कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष प्रल्हाद जाधव माजी नगरसेवक नाना पवार ,माणिक उघडे ,किशोर मगरे सिद्धार्थ रणपिसे ,बाळकृष्ण गायकवाड आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# शॉक लागल्याने वडिलांचा मृत्यू, शोधण्यास गेलेल्या मुलाचाही अंत

**सांगली**

सांगलीच्या मिरज तालुक्यातील म्हैसाळ गावात हृदयद्रावक घटना घडली आहे. विजेचा शॉक लागून तिघांचा दुर्दैवी अंत झाला आहे. तसेच एक जण गंभीर जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. प्रदीप श्रीकृष्ण वनमोरे (35), पासरनाथ वनमोरे (40) आणि शाहीराज पासरनाथ वनमोरे (12) अशी मृतांची नावे आहेत. तर हेमंत वनमोरे (15) या युवकावर उपचार सुरू आहेत.

म्हैसाळ गावात वनमोरे कुटुंबीयांची शेती आहे. सकाळच्या वेळी शेतात पाणी सोडण्यासाठी पासरनाथ वनमोरे गेले होते. त्यावेळी विजेची वायर तुटून शेतात पडली होती. शेतात चालत असताना पासरनाथ वनमोरे यांना जोराचा शॉक बसला व त्यात त्यांचा मृत्यू झाला. वडिलांना शोधण्यासाठी मुलगा शाहीराज वनमोरे शेतात आला असता त्यालाही विजेचा जोरदार शॉक बसला, यात त्याचाही मृत्यू झाला. यानंतर प्रदीप वनमोरे घटनास्थळी जात असताना त्यांनाही शॉक लागला व यात त्यांचाही मृत्यू झाला. एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

या घटनेची माहिती मिळताच मिरज ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. त्यानंतर पंचनामा करून सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. दरम्यान, वीज वितरणाच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळेच ही दुर्घटना घडली वनमोरे कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका,अनुभवी निविदाकारांकडुन "आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम" अंतर्गत ठाणे -१४८ विधानसभा मतदार क्षेत्रातील राबोडी येथील शेफी बुरोंडकर प्राथमिक व राबोडी फ्रेन्डस सर्कल उर्दु हायस्कुलजवळ शालेय विद्यार्थ्यासाठी शेड करणे व विविध स्थापत्य कामे करणे. या कामाकरीता ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागवित आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/निमशासकिय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र ठाणे महानगर पालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/ येथे दि.३०/०९/२०२४ ते दि.०७/१०/२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि.०७/१०/२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि.०८/१०/२०२४ रोजी १६.३० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा/६११/२०२४-२५

दि.२७.०९.२०२४

**सही/-**

कार्यकारी अभियंता

ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**

**www.thanecity.gov.in**

# 64 घरांच्या पटाचा 'अनभिषिक्त सम्राट' भारत

**सुहास जोशी**
ज्येष्ठ क्रीडा पत्रकार

**भारतीय संघाची विजयी दौड - पुरुष - वि. वि. मोरक्को, वि.वि. आईसलँड, वि.वि. हंगेरी 'ब— संघ, वि.वि. सर्बिया, वि.वि. अझरबैझान, वि. वि. हंगेरी 'अ' संघ, वि.वि. अमेरिका, वि.वि. चीन, वि. वि. इराण, बरोबरी उझबेकिस्तान, वि.वि. स्लोवेनिया. महिला वि. वि. जमेका, वि. वि. झेक प्रजासत्ताक, वि. वि. स्विर्झलँड, वि.वि. फ्रान्स, वि. वि. कझाकिस्तान, वि. वि. अर्मेनिया, वि. वि. जॉर्जिया, पराभूत पोलंड, बरोबरी अमेरिका, वि.वि. चीन, वि. वि. अझरबैझान**



हंगेरी, बुडापेस्ट येथे रविवारी संपन्न झालेल्या ४५व्या ऑलिंम्पियाड बुद्धिबळ स्पर्धेत भारतीय संघाने दुहेरी सोनेरी यश संपादन करताना नवा इतिहास रचला. या स्पर्धेच्या आजवरच्या ९७ वर्षांच्या मोठ्या इतिहासात भारताने प्रथमच पुरुष खुल्या आणि महिला गटाचे जेतेपद पटकावण्याचा अनोखा पराक्रम केला. या अगोदर भारताची या स्पर्धेतील मजल कांस्य पदकापर्यंतच गेली होती. परंतु हंगेरीत युवा भारतीय खेळाडूंनी शानदार कामगिरी करुन बलाढ्य चीन, अमेरिका, सर्बिया, अर्मेनिया, अझरबैझान, युक्रेन या देशांना मागे टाकून चक्क अव्वल क्रमांकावर झेप घेतली. हे जेतेपद मिळवत असताना भारताच्या डी. गुकेश, अर्जुन एरिगेसी, दिव्या देशमुख, वंतिका अगरवाल या चौघांनी वैयक्तिक सुवर्ण पदकाला गवसणी घातली.

या अगोदर भारतीय पुरुष संघांनी दोन वेळा कांस्य तर महिला संघाने एक वेळा कांस्य पदकाची कमाई या स्पर्धेत केली होती. दोन वर्षापूर्वीच चेन्नईत झालेल्या या स्पर्धेत भारताच्या दोन्ही संघांनी कांस्य पदक जिंकण्याचा पराक्रम केला होता. आता हंगेरीत त्यावर कडी करत भारतीय बुद्धिबळ संघाने आपणच ६४ घरांच्या पटाचा अनभिषिक्त सम्राट असल्याचे बुद्धिबळ विश्वाला दाखवून दिले. ११ फेऱ्यांच्या या स्पर्धेत भारतीय पुरुष संघ अपराजित राहिला त्यामुळे भारतीय संघंच विजयाचा प्रमुख दावेदार होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. तर महिला संघाला मात्र पोलंडकडून हार खावी लागली होती. अमेरिकेबरोबरची देखील त्यांची लढत बरोबरीत सुटली होती.

पुरुषांनी सहज सुवर्ण पदक मिळविताना महिलांना मात्र काहीशी कडी मेहनत करावी लागली. पुरुष विभागात एक फेरी बाकी असतानाच भारताचे अव्वल स्थान निश्चित झाले होते. तर महिला संघाला मात्र शेवटच्या लढतीत प्रथम क्रमांकासाठी अझरबैझानला नमवणे क्रमप्राप्त होते. पुरुष संघाने शेवटच्या निर्णायक ११व्या फेरीत स्लोव्हेनियाचा ३.५-०.५ गुणांनी सहज पराभव केला. डी. गुकेश, प्रज्ञानंद, अर्जुन एरिगेसी यांनी शानदार विजय मिळवून भारतीय विजयावर शिक्कामोर्तब केले. विदित गुजरातीची चौथी लढत मात्र बरोबरीत सुटली. पहिल्या लढतीत गुकेश ब्लादीमीरला आणि दुसऱ्या सामन्या अर्जुनने सुबेजिवर मात करून सामन्याचे पारडे भारताच्या बाजूने फिरवले.

महिला विभागात शेवटच्या फेरीत भारताने अझरबैझानवर देखील ३.५-०५ गुणांनी आरामात विजय मिळवून आपले देखील विजेतेपद निश्चित केले. द्रोणावली हरिका, दिव्या देशमुख, वंतिका अगरवाल या तिघींनी आपल्या लढती जिंकून सुवर्णपदकावर मोहोर उमटविली. आर. वैशालीची चौथी लढत मात्र बरोबरीत सुटली. भारतीय पुरुष संघाने २२ पैकी २१ गुणांची कमाई केली. उझबेकिस्तानविरुद्धचा सामना वगळता भारताने इतर सर्व प्रतिस्पर्ध्यांना नमविले. त्यामध्ये बलाढ्य चीन, अमेरिका, सर्बिया, स्लोवेनिया या संघांचा समावेश होता. उझबेकिस्तानविरुद्ध भारताची लढत २-२ अशी बरोबरीत सुटली. भारतीय महिला संघानी १९ गुणांची कमाई करून प्रथम क्रमांकावर झेप घेतली. महिला संघाला काहीश्या दुबळ्या पोलंडकडून हार खावी लागली.

एकाच स्पर्धेत एकाच देशाच्या दोन्ही संघांनी सुवर्ण पदक जिंकण्याची ही स्पर्धेच्या इतिहासातील केवळ ७वी वेळ होती. अगोदर ६ देशांनी असे दुहेरी यश एकाच स्पर्धेत संपादन केले होते. अर्जुन, गुकेशने अनुक्रमे १०, ९ गुणांची कमाई केली. या स्पर्धेत गुकेश पहिल्या पटावर खेळत होता. त्यानी ८ सामने जिंकले, २ बरोबरीत सोडविले. अर्जुन तिसऱ्या पटावर खेळत होता त्याने १० गुण मिळवले. त्यामध्ये ९ विजय होते तर त्याच्या २ लढती बरोबरीत सुटल्या. विदितने ७.५, प्रज्ञानंदने ६, हरिकृष्णने २.५ गुण मिळविले. महिला विभागात दिव्या देशमुख सर्व ११ फेऱ्यांमध्ये खेळली. तिने ९.५ गुणांची कमाई केली. ८ सामने जिंकताना तिने ३ लढती बरोबरीत सोडविल्या. वंतिकाने ९ लढतीत ७.५ गुण मिळविले. त्यामध्ये ६ विजय होते, तर ३ लढती अनिर्णित राहिल्या होत्या. वैशालीने ६, द्रोणावलीने ४.५, तानियाने ३.५ गुण मिळविले. २००२ नंतर या स्पर्धेत प्रथम मानांकन देण्यात आलेल्या कुठल्याच संघाला जेते पद पटकाविता आलेले नाही. २००२ मध्ये रशियन संघाने प्रथम मानांकन मिळाले असताना ही स्पर्धा जिंकली होती. पुरुष विभागात भारतीय संघ एकूण ४४ सामने खेळला. त्यामध्ये अवघा १ पराभव भारताच्या नावे लागला. तर महिलांमध्ये मात्र ५ खेळाडूंना हार खावी लागली. पुरुष गटात भारतापाठोपाठ अमेरिकेचा दुसरा, तर उझबेकिस्तानचा तिसरा क्रमांक लागला. महिला विभागात कझाकिस्तानचा दुसरा आणि अमेरिकेचा तिसरा क्रमांक लागला. प्रज्ञानंद आणि वैशाली हे दोघे भाऊ-बहिण आहेत. प्रथमच २ सुवर्ण पदके आता एका घरात आली आहेत. अनुभवी हरिकाचे हे सलग १० वे ऑलिंपियाड होते. १०व्या ऑलिंपियाडमध्ये सुवर्णपदक हरिकाच्या नावावर लागले. विशेष म्हणजे ती लवकरच बाळाला जन्म देणार आहे. या परिस्थितीत तिने भारताचे प्रतिनिधित्त्व केले ही गोष्ट नक्कीच कौतुकास्पद आहे.

यंदाच्या स्पर्धेत पुरुष गटात १९४ देशांचे ९७७ खेळाडू सहभागी झाले होते. त्यामध्ये २४५ ग्रँडमास्टर होते. तर महिलांमध्ये १८० देशांचे ९०७ खेळाडू सहभागी झाले होते. त्यामध्ये १७ ग्रँडमास्टर खेळाडूंचा समावेश होता. २०२२ मध्ये चेन्नईत झालेल्या स्पर्धेत भारताच्या दोन्ही संघांनी कांस्य पदके मिळविली होती. त्यावेळी पुरुष संघाचे प्रशिक्षक श्रीनाथ नारायण आणि महिला संघाचे प्रशिक्षक अभिजित कुंटे हे होते. त्यांनाच हंगेरी येथे झालेल्या स्पर्धेत अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाने प्रशिक्षक म्हणून कायम ठेवले होते. त्याचा मोठा फायदा भारताला नक्कीच झाला. या दोघांनी लढविलेल्या व्युहरचनेला खेळाडूंनी उत्तम साद दिल्यामुळे भारतीय संघ हे दैदिप्यमान यश मिळवू शकला.

दोघांनी या स्पर्धेसाठी संघाची चांगली तयारी करुन घेतली. खेळाडूंवर कुठलेही दडपण टाकले नाही. त्यांचा आहे तो खेळ कायम ठेवला. पुरुष गटात अर्जुन सर्वोत्तम मानांकन असलेला खेळाडू होता. त्याला तिसऱ्या पटावर खेळविण्याची चाल प्रशिक्षकांची यशस्वी ठरली. तसेच पहिल्या दोन पटावर गुकेश, प्रज्ञानंद यांना देखील खेळविण्याची केलेली व्युहरचना भारतासाठी चांगलीच फलदायी ठरली. या स्पर्धेअगोदर खेळाडूंशी सल्लामसलत केली होती. तिघांनी देखील कुठले आढेवेढे न घेता श्रीनाथ यांची व्युहरचना मान्य केली.

२०२१ मध्ये कुंटे यांची भारतीय महिला संघाच्या प्रशिक्षक पदी निवड करण्यात आली. तेव्हापासून भारतीय महिला संघाची कामगिरी चांगली सुधारत आहे. चार स्पर्धांमध्ये भारतीय महिला संघाने यश मिळविले. ऑलिंपियाड, जागतिक सांघिक स्पर्धा आणि आशियाई क्रीडा स्पर्धांचा समावेश होता. प्रशिक्षक होण्याअगोदर भारतीय संघाला फारसे यश मिळाले नव्हते. त्यामुळे भारतीय यशात कुंटे यांचादेखील महत्त्वाचा वाटा आहे असे म्हणावे लागेल. १९२७ साली लंडनमध्ये बुद्धिबळ ऑलिंपियाड स्पर्धेला प्रथम सुरुवात झाली. १९५० महायुद्ध सुरु होईपर्यंत ही स्पर्धा दरवर्षी होत होती. २ महायुद्धांमुळे ही स्पर्धा होऊ शकली नाही. महायुद्धापूर्वी दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जात होते. महायुद्धानंतर दर २ वर्षांनी ही स्पर्धा घेण्यात येते.

भारताने १९५६ साली या स्पर्धेत पहिल्यांदा भाग घेतला. त्यावेळी भारतीय संघात रामदास, बी.पी. मासेलकरसिंग, एस. व्यंकटरामन, आर. बी. सप्रे यांचा समावेश होता. 'क' गटात असलेल्या भारतीय संघाने तिसरा क्रमांक मिळविला होता. रशियाने ही स्पर्धा जिंकली होती. २०१४च्या या स्पर्धेत भारताने पुरुष गटात पहिले कांस्य पदक जिंकले होते. टी. नेगी, पी. सेतुरामन, के. शशिकिरण, ए. भास्करन, ललितबाबू यांचा भारतीय कांस्य पदक विजेत्या संघात समावेश होता. विजेत्या चीन नंतर भारत-हंगेरी दोघांचे समान १७ गुण झाले होते. परंतु सरस टायब्रेकच्या आधारे हंगेरीला रौप्य आणि भारताला कांस्य पदक मिळाले. तामिळनाडूचे बुजुर्ग खेळाडू मॅन्युअल ॲरोन १९६१ साली पहिले ग्रँडमास्टर बनले. तर तब्बल १७ वर्षानंतर व्ही. रविकुमार भारताचा पहिला आंतरराष्ट्रीय मास्टर झाला.

१९८८मध्ये विश्वनाथन आनंद भारताचा पहिला आंतरराष्ट्रीय ग्रँडमास्टर बनला. २००० मध्ये आनंदने विश्वविजेतेपद पटकावले. त्यानंतर त्यानी आणखीन जागतिक स्पर्धा जिंकून बुद्धिबळ खेळाच्या विकासासाठी नवी मुहुर्तमेढ रोवली. आनंदने आपल्या चेस अकादमीमधून अनेक युवा खेळाडू घडविले. गुकेश, प्रज्ञानंद, अर्जुन, वैशाली, वंतिका या आनंदच्याच अकादमीमधील खेळाडू आहेत. त्यामुळे भारत आज आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ विश्वात स्वत:चा दबदबा निर्माण करू शकला. एस. विजयालक्ष्मी भारताची पहिली महिला ग्रँडमास्टर झाली. भारतीय संघातील बहुतेक खेळाडू तरुण आहेत. त्यामुळे आणखी काही वर्षे तरी हे खेळाडू भारतीय बुद्धिबळाची धुरा समर्थपणे सांभाळतील यात शंका नाही. गेल्या दशकात ज्याप्रमाणे रशियाने बुद्धिबळ विश्वावर साम्राज्य निर्माण केले होते. तसेच साम्राज्य येणाऱ्या भावी काळात भारत निर्माण करेल असे म्हटले तर वावगे ठरु नये. कारण युवा खेळाडूंची सध्या खूप मोठी फळी भारतामध्ये तयार होते आहे. सध्या भारतात ८५ ग्रँडमास्टर आहेत. त्यामध्ये युवा खेळाडूंचा मोठा समावेश आहे. जागतिक क्रमावारीत अव्वल १०० खेळाडूंमध्ये पुरुष विभागात भारताचे ११ तर महिला विभागात भारताचे ९ खेळाडू आहेत. ऑलिंपियाडमधील यशामुळे या खेळाला भारतात आणखी चांगले दिवस येतील यात शंका नाही. आता आगामी नोव्हेंबर महिन्यात सिंगापूर येथे जागतिक विजेतेपदासाठी गुकेश आणि चीनचा डींग लिरेन यांच्या मुकाबला होणार आहे. ही लढत जिंकून गुकेश भारतीय बुद्धिबळ प्रेमींना विजयाची आगळी भेट देईल अशी आशा करु या.

# बेरोजगारीचे भीषण वास्तव




**भारत** हा तरुणांचा देश आहे. जगातील सर्वाधिक तरुण भारतात आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के लोकसंख्या ही तरुणांची आहे. आज आपण याच तरुणांच्या जोरावर महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. तरुणांच्या या ऊर्जेचा योग्य वापर झाल्यास भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही असा ठाम विश्वास डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांना होता. डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांच्यासारख्या द्रष्ट्या व्यक्तीने जे ओळखले ते आजच्या राज्यकर्त्यांना मात्र ओळखता आले नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल कारण आजच्या तरुणांच्या ऊर्जेचा, त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग सरकारला करून घेता येता नाही किंवा सरकार जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करत आहे याचा पुरावाच स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२३ च्या अहवालातून पाहायला मिळतो. या अहवालातून देशातील बेरोजगारीच्या समस्येचे भीषण वास्तव समोर आणले आहे. या अहवालानुसार देशात तरुण पदवीधर बेरोजगाराईचा दर ४२.३ टक्क्यांच्या उच्च स्तरावर आहे, तर कमी शिकलेल्या लोकांच्या बेरोजगारीचा दर ८ टक्के आहे. २५ ते ३० वर्ष वयोगटातील पदवीधर किंवा उच्च पात्रता धारक तरुणांचा बेरोजगरीचा दर २२.८ आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील पात्रता असलेल्या आणि २५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर २१.४ टक्के इतका आहे. याचाच अर्थ कमी शिकलेल्या पासून पदवीधर असलेल्या तरुणांपर्यंत सर्वांनाच बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे. ही आकडेवारी चिंताजनक आहे. देशातील ४० टक्क्यांहून अधिक तरुण जर बेरोजगार असतील तर त्या तरुणांच्या मानसिकता काय असेल याचा विचार न केलेलाच बरा. शिक्षण आहे, पदवी आहे, काम करण्याची उर्मी आहे, कुटुंबासाठी, देशासाठी काही तरी करुन दाखवण्याची इच्छा आहे मात्र नोकरी नाही अशी अवस्था तरुणांची आहे. नोकरी नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य आले आहे. आपण इतके शिकूनही आपल्या शिक्षणाचा उपयोग होत नाही त्यामुळे तरुण प्रचंड अस्वस्थ आहेत. शासन रोज नवे परिपत्रक काढून तरुणांचा रोजगार हिरावून घेत आहे. सध्या तर खाजगीकरणाचे पेव फुटले आहे त्यामुळे सरकारी नोकरी मिळवण्याचे तरुणांचे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. वास्तविक गेल्या अनेक वर्षांपासून सरकारी नोकर भरती झालेली नाही. नोकर भरतीसाठी सरकार जाहिरात काढते. हजारो रुपये परीक्षा फी घेऊन तरुणांची परीक्षा घेते मात्र प्रत्यक्ष नोकरी काही देत नाही. कधी पेपर फुटीचे तर आणखी काही कारण देऊन भरती पुढे ढकलली जाते. शिक्षक भरती हे त्याचे उत्तम उदाहरण. आज सरकारच्या सर्वच खात्यात कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. एक लिपिक चार चार टेबल सांभाळीत आहे, एक शिक्षक चार चार वर्ग शिकवत आहे, गेली अनेक वर्षे पदोन्नती झालेली नाही जर सरकारने सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय रद्द करून भरती केली तर देशातील बेरोजगारी काही प्रमाणात का होईना कमी होईल मात्र सरकारला तरुणांच्या रोजगाराचे काहीही देणे घेणे नाही. नोकरी मागायला गेलेल्या तरुणांना राजकीय नेते पकोडे तळा म्हणत त्यांची कुचेष्टा करत आहेत. शिक्षण असून नोकरी नाही, शेती असून शेतात काही पिकत नाही. नोकरी नाही, शेतीही बेभरावशाची झाली आहे, स्वतःचा व्यवसाय करावा म्हटलं तर भांडवल नाही त्यामुळे आजचा तरुण प्रचंड अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेचा उद्रेक केंव्हाही होऊ शकतो. जर तरुणांच्या अस्वस्थतेचा उद्रेक झाला तर भल्या भल्यांना पळता भुई थोडी होईल म्हणूनच सरकारने तरुणांच्या हाती रोजगार द्यावा. त्यांच्यात असलेल्या ऊर्जेचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घ्यावा. देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने ठोस प्रयत्न करावेत.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# जम्मू काश्मीर व 370 कलम




जम्मू कश्मीर प्रांतात विधान सभेच्या 90 जागासाठी निवडणूक होत आहे त्यात भाजपने 28 मतदार संघात उमेदवार उभे केले नाही कारण ह्या अठ्ठावीस मतदार संघात हिंदू मतदार नाहीत किंवा नसल्याबरोबर आहे त्या मुळे भाजपच्या चाणक्याने अर्थात अमित शहा यांनी उमेदवार उभे न करण्याचा धाडसी निर्णय घेतला असावा. ह्या आठ्ठावीस मतदार संघात भाजपा गुलामनबी आझाद सारख्या उदारमतवादी देशप्रेमी पक्ष संघटनेच्या उमेदवारांना निवडून येण्यासाठी मदत करून निदान देशद्रोही पाकिस्तान धार्जिन्या शक्तिच्या हाती जम्मू कश्मीरची सत्ता सहज सुलभ जाता कामा नये असा डावपेच असू शकतो जम्मू कश्मीर मध्ये मोदी भाजपा विरोधात पी डी पी, अब्दुल्ला बाप लेक, राहुल गांधीची काँग्रेस अशी सर्व इंडिया आघाडी उतरली आहे मोदींचे विरोधक देखील लव्याजामांसाहा मैदानात उतरले आहे

गेल्या आठवड्यात जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सतपाल मलिक हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानी येऊन गेले ह्या सतपाल मलिक महाशयाने जम्मू कश्मीर मधून भाजपला भुसापाट करू, भाजपचे नामोनीशान मिटवून टाकू असा विश्वास उद्धव ठाकरे यांना दिला

मोदी भाजपा विरोधकांनी निवडणूक जिंकण्यासाठी कश्मिरी जनतेला वारेमाप आश्वासने दिली आहे , 370 कलम पुन्हा लागू करण्यात येईल, जम्मू कश्मीरचा स्वतंत्र झेंडा जो पूर्वी होता तो पुन्हा बहाल करू, आतंकवादी व फत्तरफेक करणाऱ्या तुकडे तुकडे गँगला मिळणारी रसद आर्थिक मदत पुन्हा सुरु करू अश्या अनेक आश्वासनाच्या खैराती झाडल्या गेल्या आहे ,प्रश्न इथे असा निर्माण होतो की, भारताच्या संघराज्य असलेल्या जम्मू कश्मीर राज्याची सत्ता हाती घ्यायची आहे का काश्मीर भारताच्या हातातून घालवायचा आहे. शरीराने भारतात असलेला परंतु मनाने पाकिस्थानातं असलेला कश्मिरी मुसलमान देशासोबत बांधून ठेवण्याचा आहे मोदी सरकारने प्रयत्नांची पराकष्ठा करीत 370 कलम हटविले तें पुन्हा लागू करण्याचा देशद्रोही कट उधळवून लावणे महत्वाचे आहे. 370 कलम हटविले असता जगातल्या एकाही मुसलमान राष्ट्राने विरोध अथवा नाराजी व्यक्त केली नाही.

लोकसभेत राज्यसभेत बील बहुमताने मंजूर झाले असता देखील आज मेहबुबा मुक्ती, राहुल गांधी, अब्दुल्ला फॅमिलीला 370 कलम पुन्हा लागू करण्याचा पुळका का, कसा, कोणामुळे आला? राहुल गांधी कुणाचे हस्तक बनून कुणाच्या एजेंड्या वर काम करीत आहे याचा विचार देशातल्या दीडशे कोटी जनतेने केला पाहिजे. कारण, मेहबुबा मुक्ती, अब्दुल्ला यांना सोडून द्या तें आणि त्यांचे पक्ष जम्मू काश्मीर पुरते मर्यादित आहे परंतु राहुल गांधींचा काँग्रेस पक्ष राष्ट्रीय पक्ष आहे. कश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत गुजरात पासून आसाम बंगाल पर्यन्त निवडणुका लढवीत आहे. 370 कलम पुन्हा लागू करणारे राहुल गांधी महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत संविधान खतरेमे असं म्हणत संविधान नाचवीत मते मागायला येतील हे ढोंग कीती दिवस सहन करायचे?

राहुल गांधी यांचे खापर पणजोबा नेहरू, आजी इंदिरा गांधी या दोन पंतप्रधाननी कश्मीर चा प्रश्न जटील गुंतागुंतीचा करून ठेवला होता. जगाची न्याय पंचायत असलेल्या युनोत नेला होता. कश्मीर मुद्दा युनोत गेल्यामुळे त्या वर बरे वाईट बोलण्याची कुणाही सदस्य राष्ट्राची हिम्मत होत नसे आज 370 कलम निकाली निघाला आहे असे असताना राहुल गांधी मेलेले पुरलेले मुडदे का पुन्हा उकरून काढीत आहे?

पाकिस्तान व्याप्त कश्मीर POK मिळविण्याची संधी आली असताना राहुल गांधी अवसान घातकी देशद्रोही काम का करीत आहेत ?

जम्मू कश्मीरची सत्ता पुन्हा देशद्रोही इंडिया आघाडी कडे राहुल गांधीकडे गेल्यास मित्रानो कश्मीर भारतासोबत राखण्यास फार अडचणी येतील मुक्ती, गुलाम नबी, अब्दुल्ला फॅमिलीने जम्मू काश्मीर मध्ये राज भोगले परंतु एकाही राज्य सरकारने केंद्रातल्या सरकारला सहकार्य केले नाही कागदपत्रे गुप्त माहितीचे अदान प्रदान केले नाही त्याचा परिणाम आपल्या अनेक मोहिमा फसल्या आपले इंटेजेंट फेल्युअर असे बोलने फार सोपे असते परंतु फार कठीण काम असते पाकिस्तानात पेरलेले आपले गुप्तहेर मारले गेले कारण त्यांचा ठाव ठिकाणा लीक झाला त्यास जबाबदार राज्य सरकारे इंदिरा गांधी गुजराल यांच्या कारकिर्दीत अनेक गुप्त हेर मारले गेले हे विसरता कामा नये आपल्या गुप्तहेर ज्यांचे नाव जाहीर करता येत नाही त्याच्या मुळे आपण पाकिस्तान विरोधात लष्करी कारवाई यशस्वी करू शकलो .

1971 युद्धात आपण पाकिस्तानला पराभूत केले. देशाने लष्कराला श्रेय दिले परंतु त्या यशाचे श्रेय एका गुप्तहेराला आहे जो पाकिस्तानचा लष्कर प्रमुख मेजर याह्या खान यांच्याकडे खानसामा आचारी म्हणून काम करीत होता. पाक सैन्याची बारीक सारीक माहिती तो आपल्याला देत होता व आपली फौंज हल्ला चढवीत होती. मोदी भाजपा कश्मीर निवडणूक हरल्यास पुन्हा आतंकवादी संघटनाना माज मस्ती चढेल आज आटोक्यात आलेला हिंसाचार पुन्हा बळावेल.

काश्मीर निवडणूक पक्षीय दृष्टिकोनातून बघितल्याच नाही पाहिजे तर त्या कडे राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने बघितले पाहिजे आणि त्या करिता भाजपने 90 पैकी 28 मतदार संघात उमेदवार उभे केले नाही कारण देशद्रोही शक्तिकडे सत्ता जाऊ नये जम्मू कश्मीर व्यतिरिक्त देशातील जनतेने याचे गांभीर्य ओळखले पाहिजे

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी 370कलमला विरोध केला होता बाबासाहेब देशाचे कायदेमंत्री होते. सरदार पटेल गृह मंत्री होते. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर राजे राजवडे संस्थानिक बरखास्त झाले, हैद्राबादचा निजाम ज्याने स्वतंत्र भारतात विलीन होण्यास विरोध केला असता कायदे मंत्री बाबासाहेबानी निझाम विरोधात युद्ध पुकारले त्या युद्धाला पोलीस ॲक्शन असे गोंडस नाव देऊन निझामचे हैद्राबाद स्टेट खालसा केले त्याच बाबासाहेबानी पंडित नेहरू यांना सवाल केला, जम्मू कश्मीरचा लाड कशासाठी का म्हणून 370 कलम कश्मीर सोबत करार कशा साठी?

पंडित नेहरू यांनी कायदे मंत्री असलेल्या बाबासाहेबाना विनंती केली की, 370 चा ड्राफ्ट तयार करा बाबासाहेबानी नेहरूची विनंती धुदकावून लावली. पंडित नेहरू यांनी पुन्हा एकदा बाबासाहेबाना विनवणी केली 370 कलम मसुदा डोळ्याखालून घाला, बघून घ्या बाबासाहेब नेहरूना म्हणाले तुमचे 370 तुम्हाला लखलाभ, मला बघायचे देखील नाही

370 च्या पापात मला वाटेकरी व्हायचे नाही आज त्याच नेहरूचा पणतु राहुल गांधी दफन केलेले 370 पुन्हा उकरून काढीत आहे राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाला रोखने हे भारतीय जनतेचे कर्तव्य आहे. चला कर्तव्याला जागु या !

**तानसेन ननावरे**
**युनायटेड रिपब्लिकन पार्टी**

# नदीम्स एमएफए हारवूड चॅम्पियन्स लीग:ऑरेंज एफसीचा शानदार विजय

**मुंबई :** कूपरेज ,कुलाबा येथे खेळवण्यात येत असलेल्या नदीम्स एमएफए हारवूड चॅम्पियन्स लीग फुटबॉल स्पर्धेत ऑरेंज एफसीने बँक ऑफ बडोदा संघावर ५-० असा शानदार विजय मिळवत आपले वर्चस्व कायम राखले.ऑरेंजच्या . दुआनेने चौथ्या मिनिटाला गोल करत आघाडी लवकर सेट केली आणि हाफटाइमपूर्वी आणखी एक गोल केला. कामेईने 18व्या मिनिटाला आघाडी दुप्पट करून ऑरेंज एफसीला ब्रेकद्वारे 3-0 असा आरामशीर फायदा मिळवून दिला. उत्तरार्धात खतीबने ६५व्या मिनिटाला चौथा गोल केला आणि योगेशने ८९व्या मिनिटाला उशीरा गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केले.ऑरेंज एफसीच्या सर्वसमावेशक कामगिरीने त्यांची ताकद दाखवून दिली, या एकतर्फी चकमकीत बँक ऑफ बडोदाकडून कोणताही प्रतिकार प्रतिस्पर्धी संघाला जाणवला नाही.



## महाराष्ट्राच्या किशोरी खो-खो संघाची विजयी सलामी

### सिक्कीमचा 1 डाव 56 गुणांनी धुव्वा



वृत्तसंस्था
■ सिमडेगा

पुष्पुर येथील अलबर्ट एक्का स्टेडियमवर सुरू झालेल्या 34व्या किशोर-किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोरी संघाने सिक्कीमचा धुव्वा उडवित विजयी सलामी दिली.

झारखंड राज्य खो-खो असोसिएशनने आयोजित केलेल्या या स्पर्धेत साखळीच्या सामन्यात महाराष्ट्राच्या किशोरी संघानी सिक्कीमवर 1 डाव 56 गुणांनी दणदणीत विजय मिळविला. महाराष्ट्र संघाकडून अपर्णा वर्धेने सहा मिनिटे संरक्षण केले. राही पाटीलने अष्टपैलू खेळ करताना 3.10 मी. संरक्षण करीत आक्रमणामध्ये 2 गडी बाद केले. प्रणिती जगदाळे व वेदिका तामखडे यांनी आपल्या धारदार आक्रमणात अनुक्रमे 4 व 3 गडी बाद केले.

अन्य सामन्यांमध्ये सामन्यात कोल्हापूरच्या किशोरी संघास पराभव पत्करावा लागला. त्यांना ओडिसा संघाने 10 गुणांनी मात केली. कर्नाटकने मध्यप्रदेशवर 1 डाव आणि 20 गुणांनी सहज विजय मिळविला. दिल्लीने त्रिपुराचा, छत्तीसगडने अरुणाचल प्रदेशला हरविले.

किशोर गटात कर्नाटकने झारखंडचा, हरियाणाने मणिपूरचा, तेलंगणाने उत्तराखंडचा तर दिल्लीने पुद्दुचेरीचा पराभव करत गटातील आपले सलामीचे सामने जिंकले.

### 'हिटमॅन' रोहित शर्माचे स्पष्टीकरण

# वयामुळे टी-20 मधून निवृत्ती घेतलेली नाही: अजूनही तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळू शकतो!

वृत्तसंस्था
■ कानपुर

टीम इंडियाचा एकदिवसीय आणि कसोटी फॉरमॅटचा कर्णधार 'हिटमॅन' रोहित शर्माने ती मधून निवृत्तीबद्दल सांगितले आहे की टी २० क्रिकेटमधून निवृत्तीचे वय हे कारण नाही, मी अजूनही तिन्ही फॉरमॅट खेळू शकतो.

एका यूट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत रोहितने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीबाबत सांगितले की, मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा विचार करत नाही. मी टी २० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे, कारण या फॉरमॅटमधील माझा वेळ संपला होता.रोहित शर्माने 2024 चा टी २० विश्वचषक जिंकल्यानंतर टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. यानंतर टी-२० संघाचे कर्णधारपद सूर्यकुमार यादवकडे देण्यात आले.

२०१३ मध्ये महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली चॅम्पियन्स



**आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीचा विचार करत नाही**
*यूट्यूबच्या FITTR चॅनलच्या व्हिडिओमध्ये भारतीय कर्णधार रोहित शर्माला त्याच्या निवृत्तीबद्दल विचारण्यात आले तेव्हा तो म्हणाला,नाही, मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीचा विचार करत नाही आणि टी-20 क्रिकेटमधून निवृत्ती घेण्यामागील कारण म्हणजे त्या फॉरमॅटमध्ये मी माझा वेळ पूर्ण केला होता. मला या टी-20 मध्ये खेळण्याचा आनंद झाला, मी २०२४ मध्ये टी २० विश्वचषक जिंकला आणि पुढे जाण्यासाठी ही सर्वोत्तम वेळ होती कारण भारतीय संघात चांगले प्रदर्शन करू शकणारे अनेक युवा खेळाडू आहेत.*

ट्रॉफी जिंकल्यानंतर भारताने एकही आयसीसी ट्रॉफी जिंकली नव्हती. यानंतर २०२३ साली उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेली टीम इंडिया ऑस्ट्रेलियाकडून पराभूत होऊन वनडे वर्ल्ड कपच्या फायनलमधून बाहेर पडली.यानंतर टीम इंडियाने रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली २०२४ साली टी २० विश्वचषक जिंकून इतिहास रचला. या संघाने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव केला. भारताचे हे दुसरे टी-२० विश्वचषक विजेतेपद ठरले. यापूर्वी २००७ मध्ये भारताने पहिला टी-२० विश्वचषक जिंकला होता.

टी २० विश्वचषक २०२४ जिंकल्यानंतर विराट कोहली, रोहित शर्मा आणि रवींद्र जाडेजा या तिघांनीही टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. सर्वप्रथम विराटने सादरीकरण सोहळ्यात निवृत्ती घेतली. यानंतर कर्णधार रोहित शर्माने पत्रकार परिषदेत निवृत्ती जाहीर केली. जाडेजाने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करून टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. सध्या हे तिन्ही खेळाडू बांग्लादेशसोबत खेळल्या जाणाऱ्या कसोटी मालिकेत खेळत आहेत.

## झी5 करणार आईएलटी 20 सीझन 3 चे 15 टीव्ही चॅनेल आणि ओटीटी वर थेट प्रक्षेपण

प्रतिनिधी
■ मुंबई

झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेस लिमिटेड ही भारतातील कंटेंट आणि एंटरटेनमेंट पॉवरहाऊस असून, जागतिक क्रिकेट लीगचे अधिकृत प्रसारण भागीदार 11 जानेवारी 2025 पासून सुरू होणाऱ्या आईएलटी20 (ILT20) यांनी भारतीय प्रेक्षकांसाठी बहुप्रतीक्षित स्पर्धेचे प्रसारण करणाऱ्या चॅनेलची यादी जाहीर केली आहे. भारतातील आणि जगभरातील क्रिकेट चाहते व क्रीडाप्रेमी झी च्या 15 रेखीय टीव्ही चॅनेल, ओटीटी प्लॅटफॉर्म झी5 आणि त्याच्या सिंडिकेट भागीदारांच्या टीव्ही व जगभरातील डिजिटल नेटवर्कवर क्रिकेटचा हा थरार पाहू शकतात. आगामी सीझनसाठी भारतात 230 दशलक्ष प्रेक्षकसंख्या मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवून, झी ने दक्षिण भारतीय चॅनेलचा समावेश केला आहे. महिनाभर क्रिकेट कार्निव्हलचा अनुभव देऊन, त्याद्वारे आपली पोहोच वाढवेल.

11 जानेवारी ते 9 फेब्रुवारी 2025 या कालावधीत यूएई, दुबई, अबूधाबी आणि शारजाह या तीन प्रतिष्ठित ठिकाणी 34 सामने होणार आहेत. क्रिकेट चाहते झीच्या 15 सर्वाधिक वितरित आणि पाहिलेल्या टीव्ही चॅनेलवर हे रोमांचक सामने पाहू शकतात आणि भारतातील आघाडीच्या ओटीटी पैकी एक असलेल्या झी 5 वर विनामूल्य पाहता येईल. दक्षिण चॅनेल्सचा समावेश केल्याने ब्रँडला अधिक वैविध्यपूर्ण प्रादेशिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचता येईल, त्याची दर्शकसंख्या आणि अनेक भाषा व प्रदेशांमध्ये सहभाग वाढेल.

झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेस लिमिटेडच्या डिजिटल आणि ब्रॉडकास्ट महसूल विभागाचे मुख्य वृद्धी अधिकारी श्री.आशिष सहगल म्हणाले,“डीपी वर्ल्ड आईएलटी20 चा तिसरा सीझन भारतातील आणि जगभरातील क्रिकेट चाहत्यांसाठी सादर करताना झी ला आनंद होत आहे. आमच्या 15 लिनियर टीव्ही चॅनेल आणि ओटीटी प्लॅटफॉर्म झी5 वर एक रोमांचक अनुभव देणार आहे. काही उत्कृष्ट खेळाडू, प्रतिष्ठित स्टेडियम्स आणि शीर्ष स्पोर्टिंग फ्रँचायझींसह, गेल्या वर्षीच्या यशाच्या आधारे व लीगची जागतिक स्तरावर दुसरी सर्वाधिक पाहिली जाणारी T20 क्रिकेट लीग म्हणून या लीगने नाव कमावले आहे. या क्रिकेट कार्निवलचा अनुभव उंचाविण्याचे आमचे ध्येय आहे.

डेव्हिड वॉर्नर, सुनील नरेन, आंद्रे रसेल, निकोलस पूरन, लॉकी फर्ग्युसन, वानिंदू हसरंगा आणि जेक फ्रेझर मॅकगर्क यांसारख्या खेळाडूंच्या उपस्थितीने विद्यमान रोस्टर मजबूत आहे. आईएलटी20 ने, त्याच्या दुसऱ्या सत्रात, 34 हून अधिक गेममध्ये 2 लाख उपस्थितांना आकर्षित केले. जगभरातील एकूण 348 दशलक्ष दर्शकांसह, भारतातील तब्बल 221 दशलक्ष दर्शकांसह ही लीग जागतिक स्तरावर दुसरी सर्वाधिक पाहिली जाणारी T20 क्रिकेट लीग आहे.

फ्रँचायझी-आधारित स्पर्धेत आईएलटी20 मध्ये सहा संघ आणि 34 सामने आहेत, जे संपूर्ण UAE मध्ये खेळले जातात. लीगच्या सहा फ्रँचायझी संघांमध्ये अबूधाबी नाइट रायडर्स, डेझर्ट वायपर्स, दुबई कॅपिटल्स, गल्फ जायंट्स, एमआय एमिरेट्स आणि शारजाह वॉरियर्स यांचा समावेश आहे.

# मयंक यादवला बांगलादेशविरुद्धच्या टी-20 संघात संधी

### वरुण चक्रवर्तीचे पुनरागमन, सॅमसन आणि जितेश विकेटकीपर

प्रतिनिधी
■ मुंबई

बांगलादेशविरुद्धच्या टी-20 मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. सूर्यकुमारच्या नेतृत्वाखालील संघातील बहुतांश वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे. त्याचवेळी आयपीएलमध्ये 150 किमी वेगाने गोलंदाजी करून सर्वांचे लक्ष वेधून घेणारा वेगवान गोलंदाज मयंक यादवला संधी देण्यात आली आहे.

वरुण चक्रवर्ती आणि अभिषेक शर्मा यांचे संघात पुनरागमन झाले आहे. तर संजू सॅमसन आणि जितेश शर्मा यांची यष्टिरक्षक म्हणून निवड करण्यात आली. हार्दिक पंड्याही संघात आहे. बांगलादेश विरुद्ध 3 टी-20 मालिका 6 ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे.

बुमराह, शुभमनला विश्रांती

टी-20 मालिका संघातून वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्यात आली



आहे. यामध्ये वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह, शुभमन गिल, यशस्वी जैस्वाल, अक्षर पटेल, कुलदीप यादव, ऋषभ पंत आणि मोहम्मद सिराज यांचा समावेश आहे. बांगलादेशविरुद्धच्या 2 कसोटी सामन्यांच्या मालिकेतही सर्व खेळाडू टीम इंडियाचा भाग आहेत.

***टीम इंडिया***
*सूर्यकुमार यादव (कर्णधार), हार्दिक पंड्या, अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), रिंकू सिंग, रियान पराग, नितीश कुमार रेड्डी, शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, वरुण चक्रवर्ती, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), अर्शदीप सिंग, हर्षित राणा आणि मयंक यादव.*

## रत्नागिरी जिल्ह्यातील कर्दे गावाला कृषी पर्यटनासाठी सर्वोत्कृष्ट पर्यटन गाव पुरस्कार प्रदान

### पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी केले अभिनंदन



प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील कर्दे गावाला कृषी पर्यटन श्रेणीत सर्वोत्कृष्ट पर्यटन गाव पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला आहे. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने जागतिक पर्यटन दिनानिमित्त या प्रतिष्ठित पुरस्काराची घोषणा केली होती. पर्यटन संचालनालयाचे सह संचालक स्वप्निल कापडणीस,सरपंच सचिन तोडणकर, उपसरपंच दत्ताराम भुवड, कृषी अधिकारी सुनील खरात यांनी हा पुरस्कार दिल्ली येथे स्वीकारला. या स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल पर्यटन मंत्री गिरीश महाजन, पर्यटन सचिव जयश्री भोज, पर्यटन संचालक डॉ.बी. एन. पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील ९९१ गावांपैकी आठ वेगवेगळ्या श्रेणींमध्ये ३६ गावांची विजेते म्हणून निवड करण्यात आली होती. महाराष्ट्रातील १२६ ग्रामपंचायतीने यामध्ये सहभाग घेतला होता. स्थानिक अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या कृषी पर्यटनाला चालना देण्याच्या प्रयत्नांसाठी कर्दे गावाला मान्यता मिळाली. रत्नागिरीच्या किनारपट्टीवर वसलेले कर्दे हे गाव स्वच्छ समुद्रकिनारे, पांढरी वाळू आणि नयनरम्य परिसर यामुळे पर्यटकांना आकर्षित करत आहे. हा पुरस्कार महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे आणि यामुळे राज्याच्या पर्यटन विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. २०२३ मध्ये सुरू झालेल्या या स्पर्धेचा उद्देश ग्रामीण पर्यटनाला चालना देणे आणि त्या भागातील पर्यटनाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या गावांच्या प्रयत्नांना मान्यता देणे हा आहे. कृषी पर्यटन, महिला सक्षमीकरण आणि शाश्वत विकासासाठीच्या नाविन्यपूर्ण दृष्टीकोनांसाठी कर्दे गावाची निवड करण्यात आली आहे. गावाने पर्यावरणीय पर्यटनाला चालना देण्यासाठी नैसर्गिक संसाधनांचा वापर, जल व्यवस्थापन आणि कचरा व्यवस्थापन यासह विविध उपक्रम राबवले आहेत.

## पालिका अभियंत्यांच्या कामावर देखरेखीसाठी जीआयएस आधारित मोबाईल ॲप

### अभियंत्यामध्ये नाराजी, ॲप डाऊन लोड न करण्याचा निर्णय

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासनाने विभागाने २०/९/२०२४ रोजी एक परिपत्रक काढल्याने अभियंता वर्गात नाराजीचा सूर उमटला आहे.

या परिपत्रकात, विभाग कार्यालयातील सहायक अभियंता (परिरक्षण) खाते, सहायक अभियंता (घ.क.व्य.) आणि सहायक अभियंता (इमारत व कारखाने) या खात्याकडून विविध कामे पार पाडली जातात. सद्यस्थितीत उपरोक्त खात्यात कार्यरत असलेल्या कनिष्ठ अभियंता (परिरक्षण आणि रस्ते), कनिष्ठ पर्यवेक्षक (घ.क.व्य.). बीट ऑफीसर (इमारत व कारखाने) यांच्याकडून प्रत्यक्ष कार्यस्थळी पार पाडल्या जाणा-या दैनंदिन कामावर देखरेख / नियंत्रण ठेवण्याकरिता कार्यपद्धती उपलब्ध नाही. विभाग कार्यालयाकडून त्यांच्या संबंधित बीटच्या परिक्षेत्रात पार पाडल्या जाणा-या कामकाजावर नियंत्रण ठेवणे व त्याचा मागोवा घेणे, प्रत्यक्ष कार्यस्थळी करण्यात येणारी पाहणी/निरीक्षण यांच्या नोंदींचा अभिलेख डिजिटल स्वरुपात तयार होणे याकरिता जीआयएस आधारित मोबाईल ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. उपरोक्त विभागात कार्यरत असलेल्या कनिष्ठ अभियंत्यांना सोपविलेले कामकाज व त्यांनी पार पाडलेले कामकाज हयावर कोणत्याही क्षणी त्यांच्या वरिष्ठांना पर्यवेक्षण करणे सुलभ होईल. अशा त-हेने सदर मोबाईल ॲप्लिकेशन उपयुक्त आहे. असे नमूद करून या परिपत्रकातॲप्लिकेशनची वैशिष्टये व ॲप्लिकेशनची कार्यपद्धती ही दिली आहे.

या संदर्भात म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशन, मुंबई या संघटनेने पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र लिहून,

सदर कार्यप्रणाली लागू करण्याच्या प्रशासनाच्या आग्रहाचा सर्वच अभियंता संदर्भात खात्याकडून विभागातील अभियंत्यामध्ये तीव्र नाराजी असून आणि या कार्यप्रणालीचा निषेध म्हणून सदर ॲप डाऊन लोड न करण्याचे आवाहन आम्ही सर्व अभियंत्यांना केले आहे. असे कळविले आहे. त्यामुळे पालिकेत प्रशासन व अभियंता वाद चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

संबंध महापालिकेत विशेषतः विभाग कार्यालयातील कनिष्ठ अभियंता/दुय्यम अभियंता हे संपूर्ण दिवसभरात बाहेरील काम संपवून सायंकाळी उशिरापर्यंत टेबल वर्क करत असतात, कारण बऱ्याच वेळा लोक प्रतिनिधी हे विभागातील कामासाठी अभियंत्यांना पाचारण करतात, तसेच महापालिकेच्या इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दौरे त्याचप्रमाणे त्यांच्या बैठका इत्यादी कामे त्यांना न चुकता करावी लागतात. त्याप्रमाणे निवडणूकांचे कामे दैनंदिन कामे सांभाळूनसुध्दा विभागातील कामे करावी लागतात. यावरुन महापालिका प्रशासनास असे सिध्द करावयाचे आहे का, की महापालिकेत फक्त कनिष्ठ अभियंता काम करतो ? महापालिकेच्या परिपत्रकानुसार कनिष्ठ अभियंता ते उपायुक्त पर्यंत जबाबदाऱ्या ठरविण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे या अॅ ॲपमध्ये कनिष्ठ अभियंत्यांनाच केंद्रस्थानी का केले ? कनिष्ठ अभियंत्यांना प्रशासन सुशिक्षित वेठबिगार बनवू पाहत आहे का ? असा सवाल उपस्थित केला आहे.

आजच्या घडीला महापालिकेत जवळ-जवळ १२५० अभियंत्यांची पदे रिक्त आहेत. तरी सुध्दा अभियंते हा अतिरिक्त बोझा यशस्वीपणे पेलत आहेत. त्यामुळे त्यांच्यात एक अविश्वासाची भावना निर्माण झाली आहे. अभियंता संवर्गाच्या विविध प्रश्नासंबंधी आमच्या संघटनेने वेळोवेळी विविध स्तरावर मांडणी करुन वाचा फोडलेली आहे. परंतु त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रशासनाची मानिसकता दिसत नाही. असे नमूद करून

या नव्या कार्यप्रणालीस आमच्या संघटनेचा तीव्र विरोध असून आमच्याशी चर्चा केल्याशिवाय अशा प्रकारचा जी. आय. एस. आधारीत यंत्रणा लागू करु नये, अन्यथा या असंतोषाचे रुपांतर आंदोलनात झाल्यास त्यास मनपा प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहिल. असा इशारा संघटनेचे उपाध्यक्ष इंजि. रमेश भुतेकर-देशमुख यांनी पत्रात दिला आहे.

## जवाहर नगर रेल्वे पादचारी पुलावर स्वयंचलीत जिना बसविण्याची मनसेची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

गोरेगाव पूर्व पश्चिम मार्ग जोडणाऱ्या जवाहर नगर येथील पादचारी पुलास स्वयंचलीत जिना किंवा लिफ्ट बसविण्याबाबत गोरेगांव मनसेने स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे..सदर स्वाक्षरी मोहीमेस स्थानिक नागरिक, कामगारवर्ग, शालेय विद्यार्थी,ज्येष्ठ नागरिक यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

जवाहर नगर रेल्वे मार्गावर उभारण्यात आलेला हा पादचारी पुल बराच उंच आहे. त्यामुळे रुग्ण, शालेय विद्यार्थी, वयोवृद्ध यांच्या साठी तो वेदनादायक आहे. अक्षरशः हा पादचारी पूल ओलांडून जाताना वयोवृध्द, शालेय विद्यार्थ्यांची दमछाक होते म्हणून तिथे स्वयंचलीत जिना किंवा लिफ्ट बसविण्याची गरज आहे. यासाठी स्थानिक मनसेने स्वाक्षरी मोहीम राबवली. या स्वाक्षरी मोहीमेचे आयोजन तुषार (राजू)साटम, सचिन सावंत, अनंत सूद (बाबू) यांनी केले होते. तर ही स्वाक्षरी मोहीम यशस्वी करण्यासाठी मनसेचे गोरेगाव विभागातील पदाधिकारी ,महाराष्ट्र सैनिक विरेंद्र जाधव, शैलेंद्र मोरे, संजय खानोलकर, मंगेश पवार, मीनाताई आसवा, अशोक इंगोले, सागर भद्रिके, चिन्नी गोगी, संतोष शेटे, अनिल पाटील, मदन यादव, कविता गमरे, अश्विनी ऐटांबे, रोहिणी नांगरे, रुतिका उत्तेकर, मंजूषा जाधव, सविता कुंभार, अक्षय भोगटे, संतोष कबरे, हसमुखभाई शाह, अरविंद पटेल, केदार, रंजीत, व इतर महिला, पुरुष पदाधिकारी यांनी पुढाकार घेतला होता.

दरम्यान, गोरेगांव व जोगेश्वरी दरम्यान नव्याने झालेल्या राम मंदिर रेल्वे स्टेशन वरही अशाच प्रकारे पुलाचे जिने उंच आहेत. तिथेही प्रवाश्यांची जिंने चढताना व उतरताना दमछाक होत असते. यावरही उपाय योजना करण्याची गरज असल्याचे प्रवासी सांगतात.

# जागतिक हृदय दिनानिमित्ताने पालिकेकडून जनजागृती

### सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत विविध उपक्रम

प्रतिनिधी
■ मुंबई

महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत आज रविवार २९ सप्टेंबर २०२४ रोजी ‘जागतिक हृदय दिन’निमित्ताने, हृदयरोग आणि त्याच्याशी संबंधित जोखमीच्या घटकांबाबत मुंबईकरांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविले.

हृदयाशी संबंधित आजारांबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने जगभरात २९ सप्टेंबर हा दिवस ‘जागतिक हृदय दिन’ म्हणून साजरा केला जातो. ‘हृदयाचा वापर कृतीकरिता करा’ (Use Heart for Action) ही वर्ष २०२४ करिता जागतिक हृदय दिनाची संकल्पना आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत रविवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२४ पासून हृदयरोग व पोषक आहार याविषयी जनजागृती करण्याकरीता ‘जागतिक हृदय दिन’' निमित्त पोस्टर व समाज माध्यमांवर जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

‘जागतिक हृदय दिन” निमिताने नागरिकांनी आपले व आपल्या कुटुंबाचे संरक्षण करण्यासाठी दैनंदिन जीवनशैलीत योग्य बदल करावा. तसेच २४ विभागांमध्ये सुरू केलेल्या योगा केंद्राचा मुंबईकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी समस्त मुंबईकरांना उद्देशून केले आहे. मुंबईतील नागरिकांनी स्वतःचे व कुटुंबियांचे आरोग्य सुदृढ ठेवण्याकरीता 'वेळीच व्हावे दक्ष आणि द्यावे हृदयाकडे लक्ष', या उक्तीनुसार कृती करावी, असे आवाहन अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा यांनी केले आहे.

हृदयरोग हे जगभरात मृत्यूंचे प्रमुख कारण आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २०२३ जन्म-मृत्यू नोंदणी व मृत्यूच्या कारणांचे अहवालानुसार, मुंबई महानगर क्षेत्रामध्ये एकूण मृत्यू पैकी ११ टक्के मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने होत आहेत.

हृदयरोग व संबंधित आजारांकरीता महानगरपालिकेच्या वतीने, जागतिक आरोग्य संस्थेच्या (WHO) स्टेप्स सर्वेक्षण' २०२१ नुसार मुंबईत १८-६९ वर्षे वयोगटातील, ३४ टक्के नागरिकांमध्ये रक्तदाब, १८ टक्के जणांमध्ये मधुमेह असल्याचे आढळले आणि सुमारे २१ टक्के व्यक्ती वाढलेल्या कोलेस्ट्रॉलसाठी औषधोपचार घेत असलेले निदर्शनास आले आहे. तसेच सुमारे ३७ टक्के व्यक्तींमध्ये हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांचे (CVD) जोखीम घटकांपैकी तीन किंवा अधिक जोखीम घटक असल्याचे नोंदवले गेले. जसे की,

१.दररोज धूम्रपान २. वाढलेला रक्तदाब व मधुमेहासाठी औषधोपचार ३. लठ्ठपणा ४. अपुरा शारीरिक व्यायाम ५. शिफारस केलेल्या प्रमाणापेक्षा कमी फळे आणि भाज्या खाणे

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ३० वर्षांवरील व्यक्तींचे आरोग्य चाचणी सर्वेक्षण करण्यासाठी ऑगस्ट २०२२ पासून २६ रुग्णालयांमध्ये ‘विशेष रक्तदाब आणि मधुमेह तपासणी केंद्र’ (NCD Corners) सुरु केले आहेत. यात, ऑगस्ट २०२४ पर्यंत ४ लाख ५ हजार व्यक्तींची तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी ९.०५ टक्के रक्तदाबाचे तर १२.३३ टक्के मधुमेहाचे संशयित रुग्ण आढळले आहेत व पाठपुरावा सुरू आहे.

***विविध प्रकारचे संदेश***
- *हृदयरोग व संबंधित आजारांकरीता जोखमीचे घटक उदा. मद्यपान टाळणे, तंबाखू सेवन टाळणे तसेच योग्य आहार व नियमित व्यायाम करणे.*
- *हृदयरोगाच्या जोखमीचे मूल्यमापन करण्यासाठी नियमित मधुमेह, उच्च रक्तदाब तपासणी व योग्य वैद्यकीय सल्ला घेणे.*
- *हृदयरोगाची लक्षणे व छातीत दुखत असल्यास वेळेत रुग्णालयास भेट देणे.*

## महिलांच्या प्रश्नांवर घाटकोपरमध्ये निर्भय वॉक

प्रतिनिधी
■ मुंबई

महिलांच्या सुरक्षितेसाठी गांधी जयंतीच्या पूर्व संध्येला ' घाटकोपर येथे निर्भय वॉक ' काढण्यात येणार आहे.अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या पुढाकाराने घाटकोपर मधील सामाजिक संस्था, संघटनाच्या पुढाकाराने निर्भय वॉकचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार दिनांक 1 ऑक्टोबर रोजी सायं.6.30 वाजता घाटकोपर पश्चिम,भटवाडी येथील गणेश मंदिराजवळील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून घाटकोपर पूर्व येथील रायगड चौका पर्यंत हा' निर्भय वॉक 'जाणार आहे.हा वॉक मुलींच्या आणि मुलांच्या सुरक्षितते साठी आणि समाजात निकोप वातावरण निर्माण होण्यासाठी, आपला विवेक जागविण्याचा आणि 'द्वेष नको प्रेम हवे 'असे सांगत 'माणूस ' जागविण्याचा हा मार्च आहे.

महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी,अभिनेत्री चिन्मयी सुमीत, राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन वैद्य,कवी अरुण म्हात्रे,लोकशाहीर संभाजी भगत,मराठी भाषा केंद्राचे प्रा.दीपक पवार, शिवसेनेचे सचिव डॉ.संजय लाखे पाटील,शिवसेना विभाग प्रमुख सुरेश पाटील,राष्ट्रवादी काँग्रेस मुंबईच्या अध्यक्षा राखी जाधव,काँग्रेसचे ईशान्य मुंबई जिल्हाध्यक्ष अब्राहम रॉय मणी,काँग्रेसचे मुंबई गुजराथी सेल चे अध्यक्ष केतन शहा,शिवसेना महिला विभाग प्रमुख प्रज्ञा सकपाळ,राष्ट्रवादीचे युवा नेते ॲड.अमोल मातेले ,सुरज भोईर, आमीर काझी, शाकीर शेख,संदेश गायकवाड प्रभुती मान्यवर या 'निर्भय वॉक' मध्ये चालणार आहेत. घाटकोपर मधील इंडिया आघाडीच्या शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी आदी घटक पक्षांनी या निर्भय वॉकला पाठिंबा देत त्यात सहभागी होण्याचे जाहीर केले आहे.अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे शहाजी पाटोदेकर यांनी ही माहिती एका पत्रकाद्वारे दिली आहे.

